एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवा काळ

१०२ शतकोत्तर वाटचाल

• पुणे, बुधवार ६ नोव्हेंबर, २०२४ • वर्ष-४, अंक-५०, पाने-८, किंमत : ₹ ६ NAVAKAL

• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Issue - 50, Vol.- 4 Marathi - Daily - Pune, 6 November, 2024 Page- 8 Price- Rs. 6/-

24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## कामकाजाच्या अखेरच्या दिवशी शिवसेनेच्या याचिकेवर सुनावणी

**नवी दिल्ली** - शिवसेना पक्ष नाव आणि निवडणूक चिन्हासंबंधी उद्धव ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड ८ नोव्हेंबर रोजी सुनावणी करणार आहेत. महत्त्वाचे म्हणजे ८ नोव्हेंबर हा न्या. चंद्रचूड यांचा कामकाजाचा अखेरचा दिवस आहे. ते १० नोव्हेंबर रोजी निवृत्त होत आहेत. या याचिकेवरील सुनावणी गेल्या काही महिन्यांत वारंवार पुढे ढकलण्यात आली. आता कामकाजाच्या शेवटच्या दिवशी सरन्यायाधीश या प्रकरणात काय निकाल देतात याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# तुम्ही लाडकी बहीण योजना आणली आम्ही मुलांना शिक्षण मोफत देणार आहोत

## उध्दव ठाकरे यांची पहिल्या प्रचार सभेत घोषणा

**उबाठा नेते उध्दव ठाकरे यांनी आज कोल्हापुरात अंबाबाईचे मंदिरात दर्शन घेऊन प्रचाराची पहिली सभा घेतली. या पहिल्याच सभेत त्यांनी घोषणा केली की, राज्यात मुलींना मोफत उच्च शिक्षणाची सोय आहे. आता आम्ही सत्तेवर आलो तर राज्यातील मुलांना शिक्षण मोफत देणार आहोत. महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराजांचे मंदिर बांधू. इतकेच नव्हे तर सुरतमध्येही छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर उभारून दाखवू. आमचे सरकार आल्यानंतर पुढची पाच वर्षे डाळ, तेल, साखर, तांदूळ या जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवू.**



■ कोल्हापूर

**आज** शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे उमेदवार के. पी. पाटील यांच्या प्रचारासाठी कोल्हापूरला आले होते. या प्रचार सभेत काँग्रेसचे नेते सतेज पाटीलही उपस्थित होते. काल कोल्हापूरमध्ये घडलेल्या प्रकारानंतर उद्धव ठाकरे यांनी भाषणाच्या सुरुवातीलाच सतेज पाटील यांना आपल्या जवळ बोलावले. त्यावर कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. उद्धव ठाकरे यांनी सतेज पाटील यांच्यावर राधानगरी विधानसभा मतदारसंघातून के. पी. पाटील यांच्या विजयाची जबाबदारी देखील सोपवली.

उद्धव ठाकरे प्रचार सभेत म्हणाले की, लोकसभेच्यावेळी मी भाषणाची सुरुवात देशप्रेमी बांधवांनो आणि भगिनींनो अशी करत होतो. दसरा मेळाव्यात मी हिंदू बांधवांनो अशी करतो, पण आताची ही लढाई महाराष्ट्रप्रेमी विरुद्ध महाराष्ट्रद्रोही अशी आहे. महाराष्ट्रप्रेमी हे महाविकास आघाडीसोबत आहेत आणि मी लढायला मैदानात उतरलो आहे. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे हा महाराष्ट्र विकणाऱ्यांना जो मदत करील तो महाराष्ट्राचा शत्रू होईल. जो कोणी

» पान ७ वर

## थोडक्यात...

### हिना गावित यांचा भाजपाला रामराम

**नंदुरबार** - माजी खासदार हिना गावित यांनी भाजपाला रामराम केला आहे. त्यांनी पक्ष सदस्यत्वाचा व पक्षातील सर्व पदांचा राजीनामा पक्षश्रेष्ठींकडे सोपवला. हिना गावित या भाजपाच्या राष्ट्रीय प्रवक्त्या देखील होत्या. लोकसभेच्या नंदुरबार मतदारसंघात पराभूत झाल्यानंतर डॉ. हिना गावित यांनी आता विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली. त्यांनी अक्कलकुवा मतदारसंघातून विधानसभेचा उमेदवारी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. त्यानंतर भाजपा नेत्यांनी त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पक्षश्रेष्ठी त्यामध्ये अपयशी ठरले. त्यानंतर आता गावितांनी भाजपाला रामराम केला आहे.

### माफी माग किंवा ५ कोटी दे सलमानला पुन्हा धमकी

**मुंबई** - बॉलीवूड अभिनेता सलमान खानला पुन्हा धमकी मिळाली आहे. जिवंत राहायचे असेल तर बिष्णोई मंदिरात माफी मागा किंवा ५ कोटी रुपये दे असे धमकी देणाऱ्याने म्हटले आहे. काल रात्री मुंबई पोलिसांच्या वाहतूक नियंत्रण कक्षाला एक संदेश प्राप्त झाला. त्यात लिहिले होते, 'जर सलमान खानला जिवंत राहायचे असेल तर त्याला आमच्या बिष्णोई मंदिरात जाऊन माफी मागावी लागेल किंवा ५ कोटी रुपये द्यावे लागतील. आमची टोळी अजूनही सक्रिय आहे.

### बोईंगच्या कारखान्यातील संप मिटला! ३८ टक्के पगारवाढ

**सीएटल** - जागतिक स्तरावरील आघाडीची विमान उत्पादक कंपनी असलेल्या बोईंगने आपल्या कर्मचाऱ्यांना ३८ टक्के पगारवाढ दिली असून, त्यामुळे कर्मचाऱ्यांनी ७ आठवडे चाललेला संप अखेर मागे घेतला आहे. ही पगारवाढ येत्या ४ वर्षांसाठी असून, हा नवा प्रस्ताव स्विकारण्याच्या बाजूने ५९ टक्के कर्मचाऱ्यांनी मत दिले आहे. बोईंग कंपनीच्या सीएटल येथील वेस्ट कोस्ट येथील कारखान्यात गेल्या ७ आठवड्यांपासून पगारवाढीसाठी संप सुरू होता. कंपनीकडून याआधीही पगारवाढीचे दोन पर्याय देण्यात आले होते. मात्र कामगारांनी ते फेटाळले होते. अखेर काल कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी केली ऑर्टबर्ग यांनी हा नवा प्रस्ताव दिला. या कंपनीतील कामगार संघटनेने १६ वर्षांत पहिल्यांदाच हा संप केला होता.

### अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीचा उद्या निकाल

**वॉशिंग्टन** - अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी आज मतदान पार पडले असून, या निवडणुकीची मतमोजणी पूर्ण होऊन गुरुवारी निकाल लागण्याची शक्यता आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदासाठी माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची लढत विद्यमान उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांच्याबरोबर होत आहे. अमेरिकेतील मतदान आज पूर्ण झाले असून, काही राज्यात ते उद्या पूर्ण होईल. त्यानंतर मतमोजणीला सुरुवात होईल. सहसा मतदानानंतर काही तासात निकाल अपेक्षित असतात. यावेळची निवडणूक ही अत्यंत अटीतटीची असल्याने त्याला वेळ लागू शकेल. तरीही परवा गुरुवारी हे निकाल स्पष्ट होतील. काही राज्यांमधील कल कमला हॅरिस यांच्या बाजूने जात आहे, असे अमेरिकन माध्यमांनी म्हटले आहे.

# प्रत्येक खासगी मालमत्तेवर सरकार हक्क सांगू शकत नाही! सुप्रीम कोर्टाचा महत्त्वपूर्ण निर्णय

■ नवी दिल्ली



**व्यापक जनहिताचे कारण देऊन राज्य किंवा केंद्र सरकार कोणतीही खासगी मालमत्ता अधिग्रहित करू शकत नाही. सरकारला अधिग्रहणाचा बेलगाम अधिकार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ सदस्यीय खंडपीठाने आज बहुमताने दिला. न्यायालयाच्या या निकालामुळे व्यापक जनहिताच्या नावाखाली कोणतीही उपकरप्राप्त इमारत अथवा भूखंड ताब्यात घेण्याच्या म्हाडाच्या अधिकारावर अंकूश लागला आहे.**

**महाराष्ट्र** गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) कायद्यामध्ये १९८६ साली केलेल्या सुधारणेनुसार कोणत्याही उपकरप्राप्त इमारतीतील किंवा भूखंडावरील ७० टक्के रहिवाशांनी विनंती केल्यास ती इमारत अथवा भूखंड पुनर्विकासासाठी ताब्यात घेण्याचे अधिकार राज्य सरकारला देण्यात आले आहेत. ही सुधारणा करताना सरकारने देशाच्या राज्यघटनेतील अनुच्छेद ३९ (ब) चा आधार घेतला होता. अनुच्छेद ३९ (ब) नुसार जनतेच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक असल्यास खासगी मालमत्ता विकासकामांसाठी ताब्यात घेण्याचा अधिकार सरकारला आहे. म्हाडा कायद्यातील या तरतुदीला मुंबईतील प्रॉपर्टी ओनर्स असोसिएशन या संस्थेने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते.

या याचिकेवर आज सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील नऊ सदस्यीय खंडपीठाने निकाल दिला. घटनेतील अनुच्छेद ३९ (ब) मध्ये 'समाजाची भौतिक संसाधने' अशा अर्थाने खासगी मालमत्ता समाजाच्या हितासाठी ताब्यात घेण्याची तरतूद आहे. याच तरतुदीचा अर्थ खंडपीठाने आपल्या निकालात स्पष्ट केला. व्यापक जनहिताची व्याख्या करताना संबंधित उपकरप्राप्त खासगी मालमत्ता ताब्यात घेणे खरोखरच आवश्यक आहे का, ती मालमत्ता ताब्यात घेण्याव्यतिरिक्त अन्य पर्याय उपलब्ध आहेत का, मालमत्ता ताब्यात घेण्यामुळे खरोखरच व्यापक जनहित साधले जाणार आहे का, मालमत्ता ताब्यात घेतल्याचे परिणाम काय होणार आहेत याचा सर्वंकष विचार सरकारने करणे अपेक्षित आहे.

सरसकट सर्वच उपकरप्राप्त खासगी मालमत्ता ताब्यात घेण्याचा अधिकार घटनेतील अनुच्छेद ३९ (ब) सरकारला देते असा अर्थ लावणे उचित ठरणार नाही, असे मत नऊपैकी आठ न्यायाधीशांनी मांडले. न्या. बी व्ही. नागरत्न यांनी बहुमताच्या या निकालाला काही अंशी असहमती दर्शविली. तर न्या. धुलिया यांनी बहुमताच्या परस्पर विरोधी मत मांडले. मात्र बहुमताने निकाल प्रॉपर्टी ओनर्स असोसिएशनच्या बाजूने लागला. महाराष्ट्र सरकारला सर्वोच्च न्यायालयाने दिलेली ही फार मोठी चपराक मानली जात आहे.

# योगींची महाराष्ट्राच्या निवडणुकीत एन्ट्री! 'हिंदूयोद्धा' म्हणून पोस्टरवर उल्लेख

■ मुंबई



**महाराष्ट्र** विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाची तयारी जोरात सुरू आहे. आता प्रचारासाठी काहीच दिवस उरले आहेत. अशा परिस्थितीत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ भाजपाचे स्टार प्रचारक म्हणून महाराष्ट्रात येत आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची पहिली जाहीर सभा उद्या वाशिममध्ये होणार आहे. ते भाजपाचे उमेदवार श्याम खोडे यांचा प्रचार करणार आहेत. त्यांच्या स्वागतासाठी अनेक ठिकाणी पोस्टर लावले असून, त्यावर त्यांचा उल्लेख 'हिंदूयोद्धा' असा केला आहे.

हरियाणा विधानसभा निवडणुकीदरम्यान योगी यांचा नारा 'बटेंगे तो कटेंगे' हा चांगलाच गाजला होता. त्यांच्या या घोषणेने हरियाणा निवडणुकीचे चित्र बदलल्याचे मानले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही गुजरातमध्ये 'आपण एकत्र आहोत तर सुरक्षित आहोत' असे वक्तव्य केले होते. अशा परिस्थितीत योगी आदित्यनाथ वाशिमच्या जाहीर सभेत काय बोलणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# संजय वर्मा राज्याचे नवे पोलीस महासंचालक

■ मुंबई

**राज्याचे** नवे पोलीस महासंचालक म्हणून संजय वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार काल रश्मी शुक्ला यांना राज्याच्या पोलीस महासंचालकपदावरून हटवण्यात आले. पोलीस महासंचालकपदाचा अतिरिक्त पदभार विवेक फणसाळकर यांच्याकडे तात्पुरता सोपविण्यात आला होता. त्यानंतर आज राज्याच्या पोलीस महासंचालकपदी संजय वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली. संजय वर्मा हे १९९० च्या बॅचचे अधिकारी असून, ते आता पोलीस महासंचालकपदी (तांत्रिक व विधी) कार्यरत होते.

# राहुल गांधींच्या संविधान सन्मान संमेलनात प्रसारमाध्यमांवर बंदी

■ नागपूर



**लोकसभेचे** विरोधी पक्षनेते काँगेसचे राहुल गांधी उद्या महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. यावेळी नागपुरातील रेशीमबाग येथे ओबीसी युवा अधिकार मंचतर्फे 'संविधान सन्मान संमेलन' कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाला राहुल गांधी संबोधित करतील. पण या संविधान सन्मान संमेलन कार्यक्रमात प्रसार माध्यमांना बंदी घातली आहे. यावरून भाजपाने त्यांच्यावर टीका सुरू केली आहे.

या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, आणि नागरी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. मात्र, माध्यम प्रतिनिधींना प्रवेश नाकारण्यात आल्याने राज्याच्या राजकारणात नवा वाद उफाळला आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य व माध्यम स्वातंत्र्याचे गोडवे गाणाऱ्या काँग्रेसकडूनच माध्यमांवर बंदी आली, अशी भाजपाकडून टीकेची झोड उठवण्यात येत आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

» पान ७ वर

### माध्यमांना बंदी ही अफवा

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या नागपूरमध्ये होणाऱ्या संविधान सन्मान संमेलनात प्रसार माध्यमांना बंदी घातली आहे, ही भारतीय जनता पक्षाने पसरवलेली अफवा आहे. संघाच्या शिकवणीप्रमाणे व नेहमी खोटे बोलण्याच्या सवयीमुळे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस धादांत खोटे बोलले आहेत, असे स्पष्टीकरण प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिले आहे. या कार्यक्रमाचे थेट प्रसारण समाज माध्यमावरून केले जाणार

» पान ७ वर

# 'लाडकी बहीण'ची रक्कम दुप्पट करणार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पुन्हा ग्वाही

■ सातारा

**जनतेने** जर पुन्हा सत्तेची सूत्रे अधिक ताकदीने हाती सोपविली तर लाडकी बहीण योजनेची रक्कम दीड हजार रुपयांवरून तीन हजार रुपये केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे पुन्हा दिली. महायुतीचे उमेदवार महेश शिंदे यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत ते कोरेगाव येथील सभेत बोलत होते. याप्रसंगी महेश शिंदे यांचा माझा लाडका आमदार असा उल्लेख मुख्यमंत्र्यांनी केला.



महेश शिंदे यांनी कोरोना महामारीच्या काळात स्वतःच्या पैशाने कोविड सेंटर उभारले आणि त्याच्या माध्यमातून शेकडो लोकांचे प्राण वाचवले, अशा शब्दात मुख्यमंत्र्यांनी महेश शिंदे यांचे कौतुक केले. त्याचबरोबर त्यांनी खिचडी घोटाळा, बॉडीबॅग घोटाळा आणि बोगस कोविड सेंटर घोटाळ्याचा उल्लेख करीत उध्दव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला. एका बाजूला स्वतःच्या पैशातून कोविड सेंटर उभारणारे महेश शिंदे तर दुसऱ्या बाजूला महामारीच्या काळात खिचडी, बॉडीबॅग आणि बोगस कोविड सेंटरसारख्या घोटाळ्यात पैसे खाणारे यांच्यामधून कोणाची निवड करायची याचा निर्णय तुम्हाला घ्यायचा आहे, असे शिंदे म्हणाले.



काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज रायबरेलीच्या चरुवा हनुमान मंदिरात पूजा करून देश शांत, समृध्द होऊदे अशी प्रार्थना केली.

# सयाजी शिंदेंनंतर भाऊ कदमांची आता अजित पवारांना साथ

■ मुंबई

**'चला** हवा येऊ द्या' फेम अभिनेता भाऊ कदम विधानसभा निवडणुकीमध्ये अजित पवार गटाचा प्रचार करणार आहेत. आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अनेक मान्यवर कलाकार राजकीय पक्षांचा प्रचार करत आहेत. काही दिवसांपूर्वी अजित पवार गटात अभिनेते सयाजी शिंदे यांनी प्रवेश केला असून, आता पक्षाच्या प्रचाराची धुरादेखील ते सांभाळताना दिसणार आहेत. सयाजी शिंदेंपाठोपाठ आता प्रसिद्ध कॉमेडी किंग भाऊ कदम देखील अजित पवारांच्या राष्ट्रवादीचा प्रचार करताना दिसणार आहेत. लाडकी बहीण योजना यासह विविध योजनांची माहिती भाऊ कदम प्रचार रॅलीत सहभागी होऊन सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणार आहेत. भाऊ कदम यांनी आज अजित पवार यांच्या देवगिरी निवासस्थानी जाऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर भाऊ कदम हे राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करणार असल्याच्या चर्चेला उधाण आले.

# माझ्या वडिलांची हत्या हे षड्यंत्र पूनम महाजन यांचा हल्लाबोल

**शिवसेना भाजपा युतीचे शिल्पकार, भाजपाचे प्रभावी नेते, प्रमोद महाजन यांची हत्या एक मोठे षडयंत्र होते असा हल्लाबोल माजी खासदार पूनम महाजन यांनी केला आहे. लोकसभेत आपल्याला तिकीट न देणेही याच षडयंत्राचा भाग असल्याचे त्या म्हणाल्या. त्यांनी कोणाचेही नाव घेतले नसले तरी हा प्रत्यक्षात भाजपा नेत्यांवरीलच शरसंधान असल्याचे बोलले जात आहे.**

■ मुंबई

**पूनम** महाजन आज म्हणाल्या की, लोकसभा निवडणुकीत माझे तिकीट कापण्यात आले. ते एक षड्यंत्र होते. पण ते षड्यंत्र काय होते? ते कुणी रचले होते? ते शोधण्याच्या फंदात मी पडले नाही. कारण या सर्व छोट्या गोष्टी आहेत. मी प्रमोद महाजन यांची कन्या आहे. मी काम करण्याला जास्त महत्त्व देते. प्रमोद महाजन यांची हत्या हा कौटुंबिक विषय नव्हता, तर ते एक खूप मोठे षड्यंत्र होते. माझ्या वडिलांना रोखण्यासाठी त्यांची हत्या करण्यात आली होती. माझ्या वडिलांची हत्या झाली



तो दिवस आजही जसाच्या तसा आठवतो. मी त्यांना धरले होते. त्यांचे रक्त माझ्या अंगाला लागले होते. त्या रक्ताचा वास आजही कधी कधी मला येतो व अस्वस्थ करून जातो. तो माझ्यासाठी खूप दुर्दैवी क्षण होता. ज्यांच्या मांडीवर खेळून मी लहानाची मोठी झाले, त्याच बाबांना खांद्यावर उचलून घेऊन जाण्याची वेळ माझ्यावर आली. तो क्षण मी विसरू शकत नाही. मी आजही देशात कुणाच्या घरी गेले की प्रमोद महाजन यांनी आपल्याला कशी मदत केली याचे किस्से ऐकायला मिळतात. त्यावरून माझे वडील लोकांच्या मनात जिवंत आहेत याची खात्री मला पटते.

» पान ७ वर

# बीसीसीआयच्या सचिवपदी रोहन जेटलींची वर्णी लागणार



■ नवी दिल्ली

**आयसीसी** अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे नवे अध्यक्ष म्हणून भाजपा नेते अमित शहा यांचे पुत्र बीसीसीआयचे सचिव जय शहा यांची निवड झाली. त्यामुळे जय शहा यांनी बीसीसीआय सचिव पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे आता बीसीसीआय सचिव पद रिक्त झाले आहे. या रिक्त पदावर भाजपाचे दिवंगत नेते आणि माजी अर्थमंत्री अरुण जेटली यांचे पुत्र रोहन जेटली यांची वर्णी लागण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पुन्हा एकदा बीसीसीआयवर भाजपाचीच सत्ता दिसणार आहे.

दिल्ली क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष रोहन जेटली आणि गुजरात क्रिकेट असोसिएशनचे सचिव अनिल पटेल यांच्यात 'बीसीसीआय' सचिवपदासाठी स्पर्धा सुरू आहे. तरीही या सचिवपदाच्या शर्यतीत रोहन जेटली यांचेच अग्रस्थान असल्याची चर्चा आहे. सचिवपदाच्या निर्णयासाठी बीसीसीआय सदस्यांची कोणतीही सर्वसाधारण सभा घेण्यात येणार नाही. तर, सध्या चर्चेत असलेले रोहन जेटली यांच्या नावाला बहुमताने अनुमती देण्यात येणार आहे. जय शहा हे १ डिसेंबर रोजी आपला आयसीसी अध्यक्षपदाचा कार्यभार स्विकारणार आहेत. विद्यमान आयसीसी अध्यक्ष न्यूझीलंडचे ग्रेग बार्कले यांनी सलग तिसऱ्यांदा हे पद स्विकारण्यास नकार दिल्याने जय शहा यांना हे पद मिळाले आहे.

# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

HDFC बँकेत मुले मुली पाहिजेत पगार 17500-35500 डायरेक्ट भरती. संपर्क **9067849017** {NC242858}

स्टार इलेक्ट्रॉनिक्स कंपनीमध्ये सॉल्डरिंग पॅकिंग व हॅण्डप्रेसवर कामासाठी मुली व महिला पाहिजेत. भेटा - स्टार इलेक्ट्रॉनिक्स 102, श्रीपाल इंडस्ट्रीयल इस्टेट, ओनिडा कंपनीजवळ, नवघर, वसई रोड (पूर्व), मोबाईल क्रमांक - **7045311917** {NC242973}

इमीटेशन कामासाठी मुली पाहिजेत. आकर्षक पगार. भेटाः कल्प ज्वेलर्स, ऑफीस-५, पहिला माळा, कमला बिझनेस सेन्टर, अमरशी रोड, गुप्ता भेलपुरीसमोर, मालाड (वेस्ट). {NC242919}

(मोफत नोकरी) घरकामासाठी (10/12/24 तास) अनुभवी बायका / मुली पाहिजेत. पगार (18,000-40,000) रंजीतसर **9321417007 / 9892575886** {NC242721}

हेडलबर्ग 2 कलर ऑफसेट प्रिंटर पाहिजेत - 2, पगार - 22,000/- मीरारोड ईस्ट राहण्याची सोय आहे. मोबाईल : **8082888805** {NC242975}

मालाड मध्ये हॅन्डप्रेसच्या कामासाठी मुले / मुली पाहिजेत प. 15000/- **7208713536.** {NC242977}

इमिटेशन ज्वेलरीसाठी त्वरित अनुभवी मुले / मुली पाहिजेत. (मालाड वेस्ट) - **8450931541** {NC242982}

सिक्युरिटी गार्ड पाहिजे. 12 तास, 12वी पास, पगार 17500/- (PF आणि ESIC कापून) मो. नं. **8879977253 / 8879977250** {NC242979}

सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. पगार 22500 ठाणे, दादर, कुर्ला, अंधेरी **9324140788** {NC242980}

## पाहिजेत

ताडदेव येथे ऑफिससाठी कॉम्प्युटरचा अनुभव असलेले स्टाफ पाहिजेत. **9930200263** {NC242984}

संपूर्ण मुंबईमध्ये सुरक्षा गार्डसाठी पुरुष, महिला अर्जंट पाहिजेत. पगार 21500-28500 अंधेरी (ईस्ट), **9819544186** {NC242986}

**पाहिजेत**
**घाटकोपर आणि भिवंडीसाठी फॅक्टरी असिस्टंट आणि अकाऊंटन्ट असिस्टंट पाहिजे. टेली सॉफ्टवेअरचा अनुभव आवश्यक.**
**बाहुबली प्रिंटर्स**
ए -28, घाटकोपर इंडस्ट्रियल इस्टेट, अमृत नगर, घाटकोपर (प) मुंबई - 400086
Contact - 9930155496/7977185551

ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स त्वरित पाहिजेत. आकर्षक पगार संपर्क : सोनचाफा ज्वेलर्स, दादर वेस्ट **7350397721** {NC242989

पंचिंग ऑपरेटर आणि हायडलबर्ग ऑफसेटसाठी बॉयलर आवश्यक आहे. मनीष पॅकेजिंग **9689118911** उल्हासनगर {NC242981}

लोअरपरेल येथे रोज 500 रुपये डेली वेजेसवर बिल्डिंगवरील टाक्यांची सफाई करण्यासाठी गरजू, मेहनती युवक पाहिजेत. वय 40 पर्यंत काम 9 ते 6 (प्रत्येक बुधवारी पगार, गाडी भाडे, इन्शुरन्स, युनिफॉर्म ओव्हरटाईम वेगळे) संपर्क : **9821819036, 9320080200** {NC242988}

मालवण येथे अनुभवी रुम-बॉय, रिसेप्शनिस्ट, आचारी पाहिजेत. जेवण-राहण्याची सोय. संपर्क - **9423954861** {NC242964}

लोअरपरेल मध्ये कुरीयर डिलिव्हरी स्टाफ अर्जंट पाहिजेत. **9323929439** {NC242970}

सांताक्रुजमध्ये अर्जंट ड्रायव्हर पाहिजे. अनुभव- ५ ते १० वर्ष (वेस्टन लाईनमध्ये राहणाऱ्या प्रथम प्राधान्य) संपर्क **9322259537** {NC242969}

## पाहिजेत

प्रिंटिंग प्रेस लालबागमध्ये आवश्यकता आहे. १) अनुभवी पंचिंग मशीन ऑपरेटर २) ऑफसेट मशीनसाठी बॉयलर ३) ग्राफिक डिझायनर/प्री-प्रेस डिझायनर. ४) हेल्पर ५) प्रोडक्शन सुपरवायझर मुलाखतीसाठी भेटा - फोकस, २२(ए) १, हकोबा, कंपाऊंड, बॉम्बे कॉटनमील, काळाचौकी, चिंचपोकळी स्टेशन (पूर्व) आणि कॉटनग्रीन स्टेशन (पश्चिम) येथून ५ मिनिटे चालत. फोन : **9819900505** {NC242954}

घरकामासाठी महिला- मुली/मुले (भरपूर पगार) (राहण्या-खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC242907}

पॉवरप्रेस ऑपरेटर पाहिजेत. जय गणेश, गाळा नंबर - 6, बबन मिश्रा कंपाऊंड सोनावाला क्रॉस रोड नंबर 2, गोरेगांव पूर्व - **9820382105 / 9137518551** {NC242966}

पॅकिंगसाठी मुली पाहिजेत, जय गणेश गाला नंबर - 6, बबन मिश्रा कंपाऊंड सोनावाला क्रॉस रोड नंबर 2, गोरेगांव पूर्व - **9820382105 / 9137518551** {NC242967}

GDCA, HOUSING MANAGEMENT / ACCOUNTS चे क्लासेस 17 नोव्हेंबर पासून दर रविवारी दहिसर स्टेशनजवळ सुरू संपर्क - **9867662450** {NC243006}

नामांकित पेस्टकंट्रोल कंपनीला फवारणीसाठी अनुभवी मुले पाहिजेत. 108, अपोलो चेंबर, मोगरा लेन, अंधेरी (पू.), **9833110154** {NC243007}

इमिटेशन ज्वेलरी मध्ये कडी फिटिंग, स्टोन सेटिंग करण्यासाठी मुली पाहिजे. दहिसर पूर्व - Contact : **8169999128** {NC243005}

Accountant मुलगी आवश्यक आहे आणि तिला बी.कॉम पास आणि Computer ज्ञान असणे आवश्यक आहे. त्रिमूर्ती ड्रग हाऊस, दुकान क्र. 3, रामकृपा, रोकडिया लेन, गोकुळ हॉटेलच्या बाजूला, बोरिवली (पश्चिम), मो **9820080772, 9820080732** {NC243004}

**भांडुपयेथे 4 आणि 1 कलर हेडलबर्गसाठी अनुभवी प्रिंटर, फिडरमन बॉलर आणि पोलारसाठी कटर त्वरीत पाहिजेत. संपर्क :- 9769269090.** {NC243000}

मुंबईत विलेपार्ले येथे स्कॉर्पिओ गाडी चालविण्यासाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. राहण्याची उत्तम सोय. **9867354944 / 9867534944** {NC242999}

## पाहिजेत

दादर (पश्चिम) येथे महाराष्ट्रीयन दोन जणांच्या कुटुंबासाठी 24 तासांसाठी घरकाम व शाकाहारी/मांसाहारी स्वयंपाक करणारे 30 ते 45 वयोगटातील पुरुष पाहिजेत. पगार 15000/- संपर्क - **9324388020** चेतन ट्रेडर्स, सी 12, शॉप नं. 02, कस्तुरचंद मिल, लक्ष्मी कमर्शियल बिल्डींगच्या पाठीमागे, मनीष मार्केटजवळ, सेनापती बापट मार्ग, दादर वेस्ट {NC243001}

**दादर पश्चिम येथे मराठी कुटुंबात 10 तासासाठी (9 ते 7) कामासाठी 20 ते 35 वयोगटातील महिला पाहिजे. योग्य पगार. संपर्क - 9821068938** {NC243003}

मिरा रोडमध्ये 12/24 तास वयोवृद्धाला घरच्या कामासाठी त्वरित महिला पाहिजे. संपर्क - **9892693488** {NC242997}

GOREGAON / SANTACRUZ MEDICAL डिस्ट्रीब्युटर/होलसेलर/रीटेलरला - कॉम्प्युटर ऑपरेटर, अकाऊंटंट, अनुभवी सेल्समेन, रेक पीकिंग, डिलिव्हरीबॉय, सुपरवायझर, हाऊसकिपिंग आणि पॅकिंगसाठी स्टाफ पाहिजेत. **8928377811** {NC242998}

भांडुपयेथे ऑफिस बॉय आणि सुपरवायझर. पाहीजे, कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क :- **9619070016 / 9987071637.** {NC242991}

वेटर पाहिजेत. सावर्डा, तालुका चिपळूणयेथे मराठी माणसाच्या हॉटेलमध्ये कामासाठी गरजू आणि अनुभवी वेटर पाहिजेत. अजितसर - **9423294825** {NC242996}

कल्याण (कोनगाव) येथील नवीन प्रिंटिंग प्रेसमध्ये आवश्यकता आहे १) प्रॉडक्शन सुपरवायझर २) ऑफसेट प्रिंटर (हेडलबर्ग) आणि बॉयलर ३) पंचिंग मशीन ऑपरेटर ४) लॅमिनेशन मशीन ऑपरेटर ५) हेल्पर ६) पॅकिंगसाठी कॉन्ट्रॅक्टर. त्वरीत संपर्क करा. **9821434502 / 9870618007** {NC242995}

बोरीवली ऑफिसमध्ये मुलगी / बाई साफसफाई आणि कॉम्प्युटर टायपिंगसाठी पाहिजे. **9082131545** {NC242994}

जोगेश्वरी पश्चिम येथे फास्ट फुडसाठी मेहनती महिला व पुरुष कामगार त्वरीत पाहिजेत. किचनमध्ये कामाचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य. मो. नं. **9322797781** {NC243024}

मुंबई-गोवा हायवे हॉटेलसाठी त्वरित इंडियन/पंजाबी कुक आणि वेटर पाहिजेत. (राहणे-जेवणाची सोय) **9860778153, 8169184845, 9511829844** {NC243013}

## पाहिजेत

दादरमध्ये सफाई कामासाठी एक SWEEPER पुरुष पाहिजे. वय 21 ते 45 पर्यंत कामाची वेळ 10 ते 8 पगार 16,000/- + PERKS. संपर्क - सरोज (रोज 1 ते 7), 101, गुरुप्रभा सोसायटी, कोहिनूर टेक्निकल इन्स्टीटयूटजवळ, डी. एम. पाकीटवालासमोर, सेनापती बापट मार्ग, दादर (वेस्ट), फोन : **9930727727** {NC243023}

सुप्रसिध्द ऑफसेट प्रिंटिंग प्रेसमध्ये त्वरीत पाहिजेत 4 कलर कोमोरी 28x40 (ऑटो प्लेट): प्रिंटर, फीडरमॅन, बॉयलर, सायपा कटिंग मशीन ऑपरेटर, फोल्डिंग मशीन ऑपरेटर, लॅमिनेशन मशीन ऑपरेटर, पंचिंग मशीन ऑपरेटर, अनुभवी अकाऊंटंट, हेल्पर, डिलिव्हरी बॉईज.
सुविधा– ESIC,PF,BONUS, TRAVELLING
पत्ता: प्लॉट नं. २३ ते २६, भूमी वर्ल्ड इंडस्ट्रियल पार्क, नाशिक हायवे रोड जवळ, भिवंडी
9769706594

गोरेगाव फॅक्टरीमध्ये पावरप्रेस ऑपरेटर, हेल्पर, ऑफिस असिस्टंट पाहिजे. भेटा : 14, हिरा पन्ना, इंडस्ट्रीयल इस्टेट, विरवानी इस्टेटजवळ, गोरेगाव (इस्ट). **9920780753** {NC243022}

अर्जंट पाहिजेत. सिक्युरिटी गार्ड पगार 22,000/- - 18,500/- , 15,000/-, 12,000/- हाऊसकिपिंग - 14,000/- भेटा : शॉप नं. 5, हरिविजय अपार्टमेंट, शिंपोली रोड, बोरीवली (वे), **9930839380 / 8169353836** {NC243021}

प्रिंटिंग प्रेससाठी पंचिंग, फोल्डिंग ऑपरेटर, फिडरमन पाहिजेत. संपर्क : **9930589715 / 9820930362** {NC243014}

फोईलिंग ऑपरेटर आणि युवी ऑपरेटर पाहिजेत. संपर्क - **9323734843 / 8169165541** {NC243015}

2 COLOUR, 4 COLOUR H E I D E L B E R G AUTOPLATE PRINTER, POLAR CUTTING BINDER, HELPER (लॅमिनेशन रोल कटिंग, टेम्पो लोडिंग) 15000 12 hrs वालिव फाटा, वसई पूर्व - **8600755079** {NC243016}

3D Offset 4 Col Komori Auto Plate प्रिंटर, बॉयलर, फिडरमॅन, Helper, Supervisor पाहिजे. मो.: **8591709239** खोपट, ठाणे. {NC243017}

5/2 कलर फिडरमन, बॉयलर, Tally ऑपरेटर, ऑफिसबॉय पाहिजेत. लोअरपरेल - **9833552423** {NC243047}

## पाहिजेत

विरार स्टेशनजवळ (इमीटेशन ज्वेलरीचे काम) स्टोन लावण्यासाठी मुली/महिला पाहिजेत. (दिवसाचे 290/- - 310/-) **7058886269 / 9820072369** {NC243018}

डॉक्टर्स पेस्ट कंट्रोल ठाणेकरीता अनुभवी टेक्निशिअन पाहिजेत. चांगला पगार. इतर सुविधा. **9820683431 / 25325762** {NC242993}

मुलुंडमध्ये मुले सांभाळण्यासाठी आणि घरातील लहान-मोठी कामासाठी बाई पाहिजे. वेळ सकाळी 11 ते संध्याकाळी 08 संपर्क - **9820899828, 9820880788** {NC242992}

गोरेगाव मध्ये फिमेल ऑफिस असिस्टंट पाहिजे **8055772679 / 9320176123** {NC2423002}

दहावी पास मुले पाहिजेत. पगार 12000/- कायमस्वरुपी नोकरी वय 30 पर्यंत. शिवडी - **9820946244** {NC243010}

कंपनीला बँक कामासाठी फुलटाईम / पार्टटाईम मुले पाहिजेत पार्टटाईम बाईक राईडर्स पाहिजेत चांगला पगार अर्ज रेशनकार्डसहित भेटा - दुपारी 11 ते 9 स्पिडलिंक कुरीयर शॉप नं 3 आनंद अपार्टमेंट तेलीगल्ली क्रॉसरोड अंधेरी पूर्व {NC243011}

इलेक्ट्रॉनिक इन्स्ट्रुमेंट कंपनीसाठी अनुभवी डिप्लोमा इंजिनियर, ITI टेक्निशिअन आणि पीसीबी सोल्डरिंगसाठी अनुभवी महिला/ मुली पाहिजेत. प्रीमीयर इलेक्ट्रॉनिक, **9988117372** {NC243013}

गोरेगांव पूर्वेला पॅकींगसाठी मुले पाहिजेत - **9326464132 / 9321997724** {NC243009}

प्रिंटिंग प्रेससाठी हेडलबर्ग मशीनसाठी प्रिंटर, बॉयलर, पंचिंग मशीन ऑपरेटर, हेल्पर डिलिव्हरीबॉय पाहिजेत. संपर्क : क्रियेटिव्ह आर्ट, युनिट - 41, ओल्ड रामगोपाळ इंडस्ट्रीयल इस्टेट, जवाहर टॉकिजसमोर, डॉ. आरपी. रोड, मुलुंड (पश्चिम), **9222306020 / 7400203002 / 8976167616** वेळ : सायंकाळी 3.00-6.00 {NC23046}

अनुभवी डीटीपी ऑपरेटर पाहिजे. श्रीदर्शन प्रिंटिंग प्रेस, मुंब्रा. मो. : **9224462985** {NC243041}

लॅमिनेशनसाठी ऑपरेटर पाहिजेत. **9819177248 /9820911021** {NCC240077}

गिरगाव, चर्नी रोड येथे थर्मल लॅमिनेशन मशिन चालविणारा अनुभवी मुलगा पाहिजे. पगार 14,000 ते 16,000/- संपर्क : **9892663256** {NCC240076}

## पाहिजेत

इमीटेशन पॅकिंग कामासाठी मुली पाहिजेत. पगार 9500/- वयोमर्यादा 30 वर्षे, कामाची वेळ 9 ते 6.30 भद्रेश भाऊ प्रिन्सेस, रतन टेरेस कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, माटुंगा रोड (वेस्ट) स्टेशन समोर. स्वस्तिक इंडस्ट्रीज, कामगार स्टेडिमसमोर, सेनापती बापट मार्ग, दादर (वेस्ट), फोन : **8356983848** {NC243026}

लोअर परेल, मुंबई, प्रिंटिंग प्रेसमध्ये पंचिंग ऑपरेटर पाहिजे. **9320614083 / 9320307848** {NC243027}

ग्राफिक्स डिझानिंग कामासाठी लेडी पार्टनर पाहिजेत. ऑफिसबॉईज पाहिजेत. **9223429671 / 9820610810** {NC243042}

पेस्ट कंट्रोलच्या कामासाठी अनुभवी आणि बिनअनुभवी माणसाची गरज आहे. शिक्षण आणि वयाची अट नाही, संपर्क Suburban pest control Bandra West **8108077077** {NC243043}

SM-74 मशीनसाठी ऑफसेट प्रिंटर आणि टीम आवश्यक आहे. लोअरपरळ येथे संपर्क - **7506716688 / 7506716689** {NC243037}

कल्याणमध्ये अर्जंट हेल्दी, निर्व्यसनी, सुशिक्षित मुले, असिस्टंट मसाजिस्ट केअर टेकर 24 तासांसाठी कायमस्वरुपी पाहिजेत. **9324677010** {NC243025}

वज्रेश्वरी (ठाणे) येथे भक्त निवास व मंदिरमधील सर्व कामे करणेसाठी गरीब होतकरू कायमस्वरूपी तेथेच राहण्यास तयार कुटुंब तसेच संगणक येणारी महिला पाहिजे. **9869287349** {NC243028}

5 वर्ष अनुभव असलेले, इनोव्हा, क्रीस्टा, इरटिगा आणि डिझायर गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजेत. राहण्याची सोय ''मस्तकार ट्रॅव्हलर्स'' शांताराम निवास, दुसरा मजला, गोखले रोड, (नॉर्थ), दादर (वेस्ट), संपर्क : **9137227660** {NC243029}

कोमोरी मशिनसाठी फिडरमन, बॉयलर, बाईंडर, हेल्पर पाहिजेत. ठाणे - **9892636100 / 9819410350** {NC243030}

ठाणे ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत. रिसेप्शन, अकाऊंटन्ट, कॉलिंगसाठी संपर्क : **9867312811** {NC243031}

त्वरित पाहिजे डिलिव्हरी बॉय अंधेरी (ईस्ट) ऑलवीन लाईफकेअर - **9821144991** {NC243033}

4 कलर कोमोरी लिथरोन करिता अनुभवी बॉयलर पाहिजेत. अमरग्यान इंडस्ट्रियल इस्टेट, ठाणे साईप्रसाद ऑफसेट **9870078008** {NC243034}

## पाहिजेत

मालाडमध्ये पॅकिंग/हेल्पर कामासाठी मुले/मुली पाहिजे. **9588747474 / 9769694799** {NC243032}

हेडलबर्ग SM-74 फोरकलर ऑटोप्लेट ऑफसेट फिडअमन पाहिजेत. संपर्क - प्रिंट विजन, अंधेरी (पूर्व), साकीनाका **9820136761** {NC243035}

## Situation Vacant

SENIORS/ SMALL BUSINESS OWNERS/ HOMEMAKERS GET ASSOCIATED WITH INSURANCE. EARN 1,00,000/-+ MONTHLY. (WORKING FROM HOME). **94283 33827/ 82912 81700** {NC242934}

**REQUIRED**
**PRINTING PRESS SUPERVISOR**
with Responsibility of Job Scheduling, Monitoring, Quality Check & Delivery
**(SHILPHATA)**
**CTP MACHINE OPERATOR (SHILPHATA)**
**2 COL. HEIDELBERG PRINTER ( WORLI )**
**SOHAIL ENTERPRISES**
Gala No. 89, Gandhi Nagar, Bharat Bazar, Dainik Shivner Marg, Worli, Mumbai - 400018
Contact Sohail : 9619902519

WANTED FEMALE STAFF AGE 30 AND ABOVE FOR FORT AREA CONTACT BABU **9987527357/9819327357** {NC243008}

REQUIRED OFFICE BOY. CONTACT: PRESS N FORGE. A/24, SHREYAS INDUSTRIAL ESTATE, OFF WESTERN EXPRESS HIGHWAY, NEAR JAYCOACH, JOGESHWARI (EAST). {NC243045}

Need delivery boy male king circle contact Paras Mobile - **7021595696** {NC243044}

Wanted Accountant, Computer Operator, Peon, Student, Retired person. express **9167683051** {NC243040}

Require Accountant At Andheri (East) with 3 years Experience in Tally & banking Mobile **7045584509.** {NC243019}

R E Q U I R E D ACCOUNTANT AT CST WITH 3 YEARS EXPERIENCE IN TALLY & BANKING MOBILE : **8128276077.** {NC243020}

## Situation Vacant

**Kotak Design House Pvt. Ltd.**
Ladies footwear manufacturer
**Job:** Stock management + Order management
**Education:** 12th Pass
MALE, English, computer, Hardworking
**Salary:** 25,000/- p.m.
**Timing:** Morning 6am to 6pm
**Contact : 9324875606**

FEMALE OFFICE ASSISTANT KNOWING C O M P U T E R S CONTACT "CENTRAL I N V E S T M E N T S" GANESH BHAVAN, OPPOSITE MAHIM STATION WEST, **7738556611** {NC243039}

Required Male/Female for Housekeeping at Borivali saibaba nagar. For interview whatsapp biodata - **9821112796** {NC243036}

Required at Borivali for clinic Receptionist / Nursing staff part / fulltime whatsapp biodata **9821112796** for interview {NC243038}

## नर्सिंग कोर्स

100% नोकरी देणारे गव्हरमेंट कोर्सेस GNM/ANM NURSING ASSISTANT, DMLT, PHYSIOTHERAPY, OT, ICU, XRAY. OPTOMETRY, DIALYSIS ओम इन्स्टिट्यूट, मालाड, मुंबई **8080502190 / 7678007808 / 8850530054** {NC240717}

## व्यवसाय विषयक

घरबसल्या ड्रोण पेपरडिश बनवा. महिना 30 - 35 हजार कमवा दोन वर्षाचे ॲग्रीमेंट - **9028160157** {NC242956}

महिला/मुलींना महिन्याला 30000 रुपये कमवून देणारा ज्वेलरी बिजनेस **7738657263** {NC242942}

आमच्या कंपनी मार्फत प्रोडक्टची खरेदी विक्री करून 100% नफा मिळवा आणि आपले प्रॉफिट रोज च्या रोज घेऊन जा खात्रीशीर बिझनेस खात्रीशीर प्रॉफिट मिळवा. संपर्क - **8433763192/ 8452037238** {NC242972}

## वधू पाहिजे

वर कुणबी 54 घटस्फोटित 87,000/- अपेक्षा मुंबईतील/माणगाव/महाड/कोकणातील वधू पाहिजे. **9930070228** {NC242932}

# राशीभविष्य

बुधवार, दि. ६ नोव्हेंबर २०२४
संजय मनोहर

**मेष** – कौटुंबिक सुखात भर टाकणाऱ्या गोष्टी घडतील. राहत्या घराचे प्रश्न मार्गी लावू शकाल. हितशत्रूंचा त्रास होईल.

**वृषभ** – अधिक उलाढालीतून अधिक फायदा संभवतो. संततीस तेच तेच सल्ले देत बसणे टाळावे. दिलेली आश्वासने पाळू शकाल.

**मिथुन** – भावाबहिणींमधील कटूता दूर करण्याचे प्रयत्न यश देतील. प्रवासात मिळालेला आनंद अविस्मरणीय राहील. आपल्या त्रुटी ओळखून वाटचाल करावी.

**कर्क** – संवादाने बिघडणाऱ्या गोष्टी घडतील. नोकरीत वरिष्ठ, कनिष्ठ अडचणी वाढविण्याचा प्रयत्न करतील. वाहने जपून चालवावीत.

**सिंह** – त्याच त्याच गोष्टींमुळे वाढणारी त्रस्तता कमी करू शकाल. गरजूंना मदत करण्यासाठी वस्तूंची उपलब्धता राहील. घरातील ज्येष्ठांचे सल्ले उपयोगी पडतील.

**कन्या** – काळ, वेळ, पैशाचे नियोजन फायदा देईल. क्षमतेचा विचार करूनच आश्वासने द्यावी. घरच्यांना वेळ देऊ शकाल. घरगुती अडचणींवर उपाय सापडेल.

**तूळ** – प्रसंगी मौन गरजेचे ठरेल. भावंडांच्या अडचणी दूर करू शकाल. नोकरीत नवीन संधी प्राप्त होतील.

**वृश्चिक** – वडिलोपार्जित संबंधातील अडचणींवर मात करू शकाल. कर्जाची, बँकेची कामे मार्गी लागतील. मित्र-मैत्रिणींबरोबर प्रवास, सहल, मनोरंजनाचा आनंद घ्याल.

**धनु** – जुनी अडलेली कामे मार्गी लागतील. घरातील वृद्ध व्यक्तींकडून त्रास संभवतो. भावंडांचे प्रश्न सोडविण्यात यश मिळेल.

**मकर** – व्यवसायात अनपेक्षित फायदा संभवतो. घरच्यांना विश्वासात घेऊन निर्णय घेणे हितावह राहील. आरोग्याच्या तक्रारीकडे जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे ठरेल.

**कुंभ** – मनाजोगत्या घटना घडतील. नवीन संधी पदरात पडेल. घरच्यांशी सुसंवाद घडेल. प्रवासात चीज वस्तू सांभाळून असावे.

**मीन** – झटपट प्रतिक्रिया देणे टाळावे. जुगारसदृश्य व्यवहार टाळावेत. दिलेल्या शब्दामुळे आपण अडकले जाणार नाही, याची काळजी घ्यावी.

## निकाल – गणेशलक्ष्मी शुभ विकली लॉटरी – सोडत संध्या. 5:00

सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 45 • तिकीट किं. रु.10/- • सोडत दिनांक 05/11/2024

पहिले बक्षिस रु. 10000/- – MG-00 : 6860 – किशोर लॉटरी सेंटर, सांगली

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- – 5613 – महावीर लॉटरी सेंटर, कोल्हापूर

तिसरे बक्षिस रु. 1000/- – 1030, 5351 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई), 6866 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली), 7366 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली), 8240 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई)

चौथे बक्षीस रु. 400/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 400/- | 2228 | 3030 | 3893 | 4594 | 5505 | 6186 | 7172 | 8068 |
| 1062 | 2244 | 3031 | 3932 | 4724 | 5509 | 6569 | 7309 | 8080 |
| 1211 | 2332 | 3090 | 4041 | 4780 | 5529 | 6655 | 7613 | 8168 |
| 1520 | 2434 | 3321 | 4109 | 4889 | 5617 | 6680 | 7700 | 8299 |
| 1652 | 2628 | 3369 | 4226 | 4904 | 5685 | 6701 | 7708 | 8692 |
| 1659 | 2820 | 3448 | 4412 | 4970 | 5754 | 6834 | 7753 | 8738 |
| 2122 | 2825 | 3493 | 4465 | 5090 | 5957 | 6996 | 7872 | 8842 |
| 2198 | 2878 | 3563 | 4490 | 5263 | 6017 | 7017 | 7972 | 8884 |
| 2207 | 2916 | 3754 | 4500 | 5502 | 6084 | 7061 | 8058 | 8897 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल – महाराष्ट्र राज्य लॉटरी – महाराष्ट्र सह्याद्री – महालक्ष्मी विकली लॉटरी – सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 45 • तिकीट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 05/11/2024

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- – SM-00 : 1607 – श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- – 3549

तिसरे बक्षिस रु. 2000/- – 1856 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली), 3300 (हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा), 5054

चौथे बक्षीस रु. 700/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1019 | 1930 | 3351 | 4381 | 5402 |
| 1201 | 2020 | 3721 | 4491 | 5526 |
| 1218 | 2128 | 3843 | 4551 | 5576 |
| 1232 | 2362 | 3875 | 4621 | 5619 |
| 1246 | 2806 | 4039 | 4646 | 5711 |
| 1300 | 3033 | 4056 | 4720 | 5745 |
| 1473 | 3061 | 4064 | 5228 | 5750 |
| 1691 | 3192 | 4066 | 5290 | 5827 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र पद्मीनी विकली लॉटरी

सोडत दर मंगळवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 45 • सोडत दिनांक 05/11/2024

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख – PM-03 : 1416

उत्तेजनार्थ बक्षिस रु. 5000/- – पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी – 1416 – पवार लॉटरी - ठाणे, सिराज एन्टरप्रायझेस - नागपूर

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 1526 | 1560 | 1955 | 2672 | 5110 | 6956 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1556 | 1896 | 4491 | 5434 | 5608 | 5677 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1685 | 2272 | 2880 | 3280 | 3474 | 6213 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1613 | 2164 | 2315 | 4592 | 4842 | 6870 |

सहावे बक्षिस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| रु.100/- (सर्व मालिकांसाठी) | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1650 | 2148 | 2527 | 3071 | 3427 | 3986 | 4434 | 4846 | 5446 | 5764 | 6247 | 6658 |
| | | 1670 | 2150 | 2529 | 3075 | 3433 | 4004 | 4435 | 4847 | 5476 | 5769 | 6259 | 6661 |
| 1012 | 1320 | 1686 | 2160 | 2532 | 3090 | 3436 | 4030 | 4441 | 4848 | 5488 | 5773 | 6275 | 6663 |
| 1015 | 1340 | 1700 | 2170 | 2550 | 3129 | 3462 | 4036 | 4455 | 4869 | 5489 | 5780 | 6285 | 6674 |
| 1016 | 1351 | 1716 | 2178 | 2567 | 3136 | 3463 | 4038 | 4460 | 4875 | 5501 | 5785 | 6299 | 6676 |
| 1018 | 1357 | 1740 | 2204 | 2599 | 3140 | 3469 | 4075 | 4467 | 4906 | 5508 | 5795 | 6304 | 6677 |
| 1036 | 1371 | 1752 | 2207 | 2602 | 3144 | 3477 | 4084 | 4480 | 4936 | 5512 | 5875 | 6329 | 6679 |
| 1038 | 1381 | 1794 | 2213 | 2617 | 3158 | 3496 | 4088 | 4489 | 4946 | 5514 | 5879 | 6334 | 6682 |
| 1048 | 1383 | 1801 | 2225 | 2618 | 3173 | 3506 | 4094 | 4492 | 4974 | 5515 | 5885 | 6362 | 6688 |
| 1061 | 1405 | 1813 | 2227 | 2632 | 3193 | 3507 | 4099 | 4493 | 4979 | 5520 | 5904 | 6378 | 6706 |
| 1080 | 1409 | 1818 | 2239 | 2654 | 3198 | 3511 | 4142 | 4494 | 4994 | 5525 | 5905 | 6380 | 6709 |
| 1100 | 1415 | 1828 | 2246 | 2658 | 3232 | 3517 | 4143 | 4518 | 5015 | 5527 | 5906 | 6404 | 6768 |
| 1108 | 1419 | 1878 | 2251 | 2676 | 3234 | 3523 | 4146 | 4519 | 5032 | 5529 | 5931 | 6412 | 6769 |
| 1113 | 1420 | 1886 | 2257 | 2721 | 3254 | 3532 | 4147 | 4522 | 5049 | 5540 | 5939 | 6414 | 6776 |
| 1124 | 1422 | 1891 | 2261 | 2723 | 3293 | 3550 | 4164 | 4532 | 5051 | 5544 | 5944 | 6424 | 6777 |
| 1136 | 1431 | 1910 | 2277 | 2732 | 3300 | 3553 | 4201 | 4540 | 5054 | 5550 | 5951 | 6448 | 6780 |
| 1145 | 1455 | 1912 | 2279 | 2738 | 3304 | 3558 | 4203 | 4589 | 5056 | 5555 | 5959 | 6455 | 6788 |
| 1167 | 1467 | 1913 | 2294 | 2782 | 3308 | 3620 | 4206 | 4623 | 5075 | 5556 | 5999 | 6495 | 6793 |
| 1171 | 1468 | 1916 | 2312 | 2787 | 3311 | 3631 | 4238 | 4627 | 5080 | 5565 | 6008 | 6503 | 6797 |
| 1175 | 1469 | 1948 | 2321 | 2822 | 3313 | 3645 | 4268 | 4638 | 5083 | 5566 | 6009 | 6542 | 6813 |
| 1176 | 1471 | 1967 | 2327 | 2825 | 3329 | 3659 | 4279 | 4686 | 5087 | 5569 | 6016 | 6550 | 6834 |
| 1183 | 1484 | 1971 | 2328 | 2826 | 3331 | 3685 | 4295 | 4740 | 5116 | 5575 | 6031 | 6561 | 6845 |
| 1187 | 1501 | 1974 | 2329 | 2842 | 3341 | 3703 | 4298 | 4742 | 5130 | 5581 | 6039 | 6570 | 6854 |
| 1190 | 1513 | 1991 | 2330 | 2847 | 3353 | 3735 | 4314 | 4754 | 5157 | 5592 | 6051 | 6573 | 6856 |
| 1192 | 1519 | 1994 | 2341 | 2853 | 3355 | 3736 | 4326 | 4782 | 5177 | 5596 | 6056 | 6583 | 6861 |
| 1193 | 1524 | 1997 | 2348 | 2876 | 3364 | 3779 | 4335 | 4796 | 5208 | 5606 | 6065 | 6587 | 6863 |
| 1196 | 1526 | 2008 | 2360 | 2879 | 3368 | 3789 | 4353 | 4809 | 5255 | 5608 | 6069 | 6601 | 6866 |
| 1199 | 1549 | 2013 | 2366 | 2892 | 3372 | 3872 | 4380 | 4810 | 5259 | 5649 | 6070 | 6602 | 6873 |
| 1224 | 1564 | 2029 | 2401 | 2912 | 3378 | 3905 | 4404 | 4814 | 5285 | 5656 | 6076 | 6603 | 6876 |
| 1234 | 1565 | 2041 | 2412 | 2926 | 3390 | 3907 | 4414 | 4818 | 5302 | 5703 | 6089 | 6610 | 6889 |
| 1241 | 1579 | 2072 | 2429 | 2937 | 3393 | 3914 | 4415 | 4830 | 5307 | 5709 | 6098 | 6615 | 6896 |
| 1269 | 1597 | 2081 | 2468 | 2938 | 3399 | 3931 | 4419 | 4831 | 5335 | 5716 | 6132 | 6621 | 6899 |
| 1271 | 1600 | 2082 | 2474 | 2939 | 3407 | 3939 | 4420 | 4836 | 5351 | 5717 | 6154 | 6630 | 6955 |
| 1286 | 1602 | 2117 | 2475 | 2972 | 3420 | 3940 | 4427 | 4842 | 5371 | 5735 | 6211 | 6637 | 6956 |
| 1289 | 1603 | 2125 | 2501 | 2978 | 3424 | 3973 | 4429 | 4843 | 5385 | 5749 | 6220 | 6644 | 6962 |
| 1317 | 1627 | 2128 | 2521 | 3026 | 3425 | 3985 | 4430 | 4844 | 5425 | 5755 | 6241 | 6653 | 6996 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल – महाराष्ट्र राज्य लॉटरी – महाराष्ट्र गजलक्ष्मी मंगल विकली लॉटरी – सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 45 • तिकीट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 05/11/2024

| मालिका | GL-00 | GL-01 | GL-02 | GL-03 | GL-04 |
|---|---|---|---|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | 0026 | 5407 (वैशाली लॉटरी - बोरिवली) | 8834 | 6595 (श्री सिद्धि समर्थ एजेंसी, दादर - मुंबई) | 1135 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

दुसरे बक्षिस रु. 5000/- – 0408, 1521

तिसरे बक्षिस रु. 2000/- – 3488, 5414 (वैशाली लॉटरी - बोरिवली), 6646 (पवार लॉटरी - ठाणे), 7236, 8927

चौथे बक्षिस रु. 1000/- – 0738, 2480, 4952, 5102, 5411, 6412, 6955, 8172, 8534, 9205

पाचवे बक्षिस रु. 500/- – 0388, 0493, 1682, 5402, 7074, 8373, 8902, 9399, 9569, 9702

सहावे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| सहावे बक्षिस रु. 300/- | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0940 | 1985 | 2804 | 4148 | 4906 | 5658 | 6416 | 7235 | 8550 | 8969 |
| | 0950 | 1997 | 2932 | 4173 | 4961 | 5724 | 6438 | 7287 | 8588 | 9007 |
| 0024 | 0987 | 2006 | 2961 | 4345 | 4978 | 5823 | 6479 | 7350 | 8589 | 9139 |
| 0055 | 1110 | 2057 | 3038 | 4354 | 4979 | 5852 | 6526 | 7391 | 8631 | 9223 |
| 0062 | 1113 | 2125 | 3193 | 4403 | 5002 | 5873 | 6552 | 7511 | 8677 | 9316 |
| 0094 | 1166 | 2201 | 3204 | 4406 | 5052 | 5902 | 6565 | 7567 | 8739 | 9317 |
| 0134 | 1170 | 2224 | 3238 | 4427 | 5069 | 5915 | 6602 | 7616 | 8801 | 9409 |
| 0230 | 1235 | 2225 | 3244 | 4432 | 5155 | 5935 | 6619 | 7685 | 8802 | 9490 |
| 0238 | 1424 | 2239 | 3306 | 4443 | 5163 | 5937 | 6636 | 7775 | 8824 | 9496 |
| 0295 | 1488 | 2277 | 3383 | 4447 | 5202 | 5951 | 6694 | 7785 | 8826 | 9529 |
| 0406 | 1706 | 2425 | 3452 | 4540 | 5232 | 5959 | 6696 | 7792 | 8840 | 9561 |
| 0460 | 1776 | 2427 | 3553 | 4568 | 5389 | 6029 | 6761 | 7798 | 8863 | 9587 |
| 0482 | 1795 | 2479 | 3589 | 4619 | 5405 | 6074 | 6766 | 7959 | 8883 | 9649 |
| 0501 | 1812 | 2561 | 3602 | 4674 | 5423 | 6165 | 6811 | 8088 | 8892 | 9699 |
| 0503 | 1847 | 2580 | 3629 | 4696 | 5518 | 6226 | 6895 | 8283 | 8896 | 9822 |
| 0529 | 1874 | 2636 | 3773 | 4698 | 5571 | 6257 | 6954 | 8310 | 8909 | 9859 |
| 0607 | 1875 | 2672 | 3824 | 4701 | 5591 | 6267 | 6967 | 8428 | 8924 | 9963 |
| 0641 | 1931 | 2683 | 3833 | 4767 | 5595 | 6274 | 6977 | 8507 | 8929 | 9969 |
| 0880 | 1932 | 2764 | 3931 | 4813 | 5654 | 6325 | 7223 | 8536 | 8967 | 9985 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

**वाचकांना सूचना**

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वत:च्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# रत्नागिरी जिल्ह्यात भात कापणीच्या कामाला वेग

■ कणकवली

**गेल्या** काही दिवसांपासून कोकणात पावसाने विश्रांती घेतली आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी भातकापणी, तसेच भात झोड्री सुरु केली आहे.मात्र तळकोकणात म्हणजेच कुडाळ , मालवण, वेंगुर्ला या तालुक्यांमध्ये अजून काही ठिकाणी अवकाळी पाऊस सुरु आहे. अवकाळी पडलेल्या पावसाने ग्रामीण भागात भातशेतीचे नुकसान झाले. पावसाने विश्रांती घेतल्याने रत्नागिरी तालुक्यातील गावखडी, पूर्णगड, पावस येथे भात कापणी, भात झोडणी कामांना वेग आला आहे. तसेच शेतकरी बांधव शेती कामात व्यस्त असल्याचे चित्र ग्रामीण भागात पहायला मिळत आहे. हलव्या भातपिकांची कापणी सुरु असून वलाट पट्ट्यात कातळावरील भातकापणीला वेग आला आहे.

# कर्जत-जामखेडमध्ये पुन्हा रोहित पवार विरूद्ध राम शिंदे

■ कर्जत

**जामखेड** विधानसभा मतदारसंघात महायुतीकडून भाजपचे आमदार प्रा. राम शिंदे तर महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्यातच पुन्हा प्रमुख लढत होणार आहे. दोन्ही प्रमुख उमेदवारांनी अखेरच्या टप्प्यात नाराजांचे मन वळविण्यात यश मिळविले. विखे समर्थक असणारे अंबादास पिसाळ आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते ॲड. कैलास शेवाळे यांनी उमेदवारी अर्ज अखेरच्या क्षणी मागे घेतले. आता एकूण ११ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उरले आहेत.

# गोव्यात १०० टक्के विमा संरक्षण देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

■ पणजी

**केंद्र** सरकारने बँकांच्या माध्यमातून अल्प दरात विमा उतरवण्याची सोय केली आहे. त्याचा लाभ घेत गोव्यातील जनतेला १०० टक्के विमा संरक्षण दिले जाईल,असे आश्वासन मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी दिले. पंतप्रधान सुरक्षा विमा योजना आणि पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजनेच्या जागरूकता मोहिमेवर दोन वाहने राज्यभरात पाठवण्यात आली आहेत. त्यांना आज सावंत यांनी हिरवा झेंडा दाखविला. मृत्यूच्या विमा संरक्षणाची तातडीची गरज असल्याचे अधोरेखित केले. राज्यात वाहन अपघातांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे प्रत्येकाने विमा उतरवला पाहिजे.असे सावंत यांनी सांगितले.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# मतदारांच्या संख्येतील सकारात्मक वाढ

कोणत्याही प्रकारची निवडणूक म्हटली की, त्यात लोकशाहीचा गजर केला जातो. राजकीय पक्ष त्यांचे उमेदवार, त्यांचा प्रचार आणि निवडून येण्यासाठी केली जाणारी धडपड या सगळ्या गोष्टींचाच निवडणूक काळामध्ये प्रभाव राहत असतो. लोकशाहीची व्याख्या करताना लोकांनी लोकांसाठी राबवलेली पद्धती म्हणून लोकशाहीचा गौरव केला जातो. परंतु हे लोक म्हणजे कोण तर जे आज लोकशाही प्रक्रियेत प्रत्यक्षपणे सहभागी होतात. लोकशाहीनेच त्यांना दिलेला मतदानाचा अधिकार जे बजावतात किंबहुना मतदान करून आपला हक्क तर ते उपयोगात आणतातच परंतु राष्ट्रीय दृष्ट्या सर्वात मोठे कर्तव्यसुद्धा त्यांच्याकडून पार पडत असते. मतदारांमधला हा राष्ट्रीय कर्तव्याचा भाव जागृत करणे आणि एकूण लोकशाही प्रक्रियेत राजकीय पक्षांपेक्षाही मतदार हा अधिक महत्त्वाचा आहे हे वारंवार बिंबवले जाणे खूप महत्त्वाचे ठरते. दुर्दैवाने राजकीय पक्ष स्वतःच्या स्वार्थाचा विचार करीत असतात. प्रसिद्धीची वेगवेगळी तंत्र वापरून अधिकाधिक प्रकाशझोतात राहण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांनी मतदाराला गृहित धरलेले असते. परंतु त्याच्याकडून बजावले जाणारे मतदानाचे हक्क अशा पद्धतीने दुर्लक्षित करणे योग्य ठरत नाही. कदाचित यासाठीच निवडणूक आयोगाकडून वारंवार मतदानाचे महत्त्व सांगितले जाते. आणि मतदारांची संख्या अधिकाधिक वाढावी म्हणून प्रयत्न केले जात असतात. आतादेखील महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने हिच मतदार यादीची मोहीम सुरू झाली आहे आणि यातला सकारात्मक महत्त्वाचा भाग म्हणजे अगदी लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभा निवडणुकीसाठी मतदारांची संख्या वाढल्याचे निवडणूक आयोगाने आवर्जून लक्षात आणून दिले आहे. लोकसभा निवडणुकीच्यावेळी राज्यातील मतदारांची संख्या ९ कोटी ६० लाख होती. आता ही संख्या ९ कोटी ७० लाख झालेली आहे. मतदारसंघांची ही वाढ लक्षात घेतली तर छोट्या प्रमाणात का असेना परंतु लोकशाहीविषयक जागरुकता वाढत असल्याचे ते निदर्शक ठरते.

### नवमतदारांची संख्या

मतदार संघांच्या लोकसंख्येमध्येदेखील वाढ होत असल्याने अनेक मतदारसंघातील मतदारांचीही त्याप्रमाणात वाढ नोंदली जात आहे. यामध्ये जवळपास साडेचार कोटी महिला मतदार आणि उर्वरित पुरुष मतदार आहेत. यावेळेला तर अनेक मतदारसंघांमध्ये १८ ते ३० वयोगटातील तरुण मतदारांची संख्यादेखील वैशिष्ट्यपूर्ण ठरते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या मधल्या काळात जवळपास तीस हजार नवे मतदार नोंदले गेले आहेत. प्रथमच मतदान करणार असल्याने त्यांचे मतदान अनेक मतदारसंघांमधल्या विजयाच्या गणितांवरही परिणाम करणारे ठरू शकतात. अगदी मुंबईसारख्या महानगरात उपनगरांमध्ये नवमतदार अधिक प्रमाणात नोंदले गेले आहेत. यातला लोकशाही प्रक्रियेच्यादृष्टीने विचारात घेण्याचा मुद्दा एवढाच आहे की, मतदारांची नोंदणी वाढते आहे. म्हणजे लोकसभा निवडणुकीत ९७ कोटी मतदारांची नोंद झाल्याचे सांगितले गेले. गेल्या लोकसभा निवडणुकीपेक्षा यावेळी सहा कोटी नवीन मतदार नोंदले गेले होते. आता विधानसभा निवडणुकीतही मतदार वाढीचा हा क्रम सुरू राहिला आहे. निवडणूक आयोगाकडून मतदारवाढीसाठी केले जाणारे प्रयत्न आणि मतदारांना प्रोत्साहित करण्यासाठी आखल्या जाणाऱ्या योजना बघितल्या तर अधिक व्यापक परिणाम साधला जाणे आवश्यक ठरतो. ज्याप्रमाणात मतदारांची नोंदणी होते आहे. त्याप्रमाणात मतदानाची टक्केवारी वाढताना दिसत नाही. लोकसभा निवडणुकीत निवडणूक आयोगाकडून प्रचंड प्रमाणावर प्रचार-प्रसार केला गेला. तरीसुद्धा दिवसभरातील मतदानाची टक्केवारी सरासरी साठ ते पासष्ट टक्केच राहिली. याचा अर्थ केवळ नोंदणी करून उपयोगाचे नाही. तर झालेल्या नोंदणीचा प्रत्यक्ष मतदानामध्ये प्रभाव दिसणे तितकेच गरजेचे ठरते. महाराष्ट्रात तर यावेळी वयाची शंभरी उलटल्याने जवळपास ४७ हजार मतदार असल्याचा आकडादेखील निवडणूक आयोगाने आवर्जून सांगितलेला आहे. विशेष म्हणजे प्रत्यक्ष मतदानामध्ये ज्येष्ठ नागरिकांची सक्रियतादेखील अधिक प्रमाणात असते. आता तर ज्येष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन त्यांचे मत घरी जाऊन घेण्याचा प्रयोग निवडणूक आयोगाने सुरू केला आहे. म्हणजे मतदारांमधली सक्रियता वाढावी हाच त्यामागचा उद्देश असल्याचे स्पष्ट दिसून येते.

### राजकीय पक्षांचेही प्रबोधन व्हावे

यातला दुर्दैवाचा भाग एवढाच आहे की, राजकीय पक्ष मात्र मतदारांच्याबाबतीत अत्यंत स्वार्थी दृष्टीकोन ठेवत असतात. त्यांच्याकडून कधीही मतदारांची संख्या वाढण्यासाठी ठोस प्रयत्न होत नाहीत किंवा मतदान वाढावे यासाठी प्रोत्साहनात्मक कुठलेही उपक्रम राबवले जात नाहीत. खरे तर निवडणूक आयोगाशी समन्वय साधून आणि निव्वळ एक राष्ट्रीय कर्तव्य किंवा मतदारांविषयीचा आदर व्यक्त करण्यासाठी राजकीय पक्षांनी पुढाकार घेतला पाहिजे. निवडणूक आयोग करीत असलेल्या प्रयत्नांमध्ये आपलेही योगदान दिले पाहिजे. कधीतरी मतदारांची संख्या वाढल्याबद्दल जाहीरपणे मतदारांचे आभार मानण्याचे सौजन्य दाखवले पाहिजे. केवळ मतदार राजा असे म्हणून स्वार्थीपणाचे प्रदर्शन न करता त्या राजाविषयीचा तितकाच कृतज्ञताभाव राजकीय पक्षांनी दाखवला पाहिजे. सामान्य मतदाराला मार्गदर्शन करण्यासाठी किंवा मतदार नोंदणी करून घेण्यासाठी राजकीय पक्षांच्या कार्यालयांमध्ये कायमस्वरूपी मदतकक्ष असला पाहिजे. परंतु अशा प्रकारची व्यापक संवेदनशीलता राजकीय पक्षांकडे नाही. निवडणुकीचा बाजार आला की, मतदार नावाचा गिऱ्हाईक त्यांना आठवतो आणि आपापल्या राजकीय पक्षाची दुकानदारी चालावी म्हणून त्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न होतो. जसे मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य असल्याचा उपदेश हे राजकीय पक्ष करीत असतात तसाच मतदारांची संख्या वाढवणे आणि वाढलेल्या मतदारांना धन्यवाद देणे हेसुद्धा राजकीय पक्षांनी आपले राष्ट्रीय कर्तव्यच मानले पाहिजे. लोकशाहीविषयीची एकांगी भूमिका म्हणजे सत्ता बळकावण्यासाठी चाललेला राजकारण्यांचा खटाटोप अत्यंत दुर्दैवी ठरतो. निवडणूक आयोगानेसुद्धा राजकीय पक्षांचा हा संकुचितपणा दूर करण्यासाठी त्यांचे प्रबोधन करण्याची आवश्यकता आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११


कधी आडल्या नडल्याची हाक जर तुमच्यापर्यंत पोहोचत असेल, तर ईश्वराचे आभार माना. कारण तो ईश्वर समर्थ असतानाही इतरांच्या मदतीसाठी त्याने तुमची निवड केलेली असते.

## पंचांग

**बुधवार, ६ नोव्हेंबर, २०२४**
**शक १९४६ क्रोधीनामसंवत्सर**



**रवी उदय- ०६-४२**
**रवी अस्त- १८-०२**



**कार्तिक शुक्ल पंचमी**
**नक्षत्र : मूळ**
**-: जन्मराशी :-**
००-०१ ते २४-०० धनु

**पांडव पंचमी, कडपंचमी, ज्ञानपंचमी, सूर्य विशाखाला स. ८.४५**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे**
(*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)
संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### भाताचे वडे

★ **साहित्य** - १ कप भात (शिळा किंवा ताजा कोणताही चालेल) ज्वारीचे पीठ (गरजेनुसार), १ टेस्पून तांदळाचे पीठ, १/२ टिस्पून जिरे, १/४ चमचा हळद, २ टिस्पून मिरचीची भरड पेस्ट, १ टिस्पून धणेपूड, मुठभर कोथिंबीर बारीक चिरून, चवीपुरते मीठ, तळण्यासाठी तेल

★ **कृती** - भात जर फडफडीत असेल तर पाण्याचा हबका मारून वाफवून नरम करून घ्यावा. मायक्रोव्हेवमध्ये केल्यास पटकन होईल. नरम झालेल्या भातात जिरे, हळद, मिरची, धणेपूड, कोथिंबीर आणि मीठ घालून मिक्स करावे. तांदळाचे पीठ घालावे आणि मळावे. नंतर भातात मावेल इतके ज्वारीचे पीठ चमच्याने घालावे. मळून अंदाजाने पीठ घालावे. (१ कप भाताला साधारण १/२ ते ३/४ कप पीठ लागेल.). थोडे तेल हातावर घेऊन गोळा मळावा. पिठाचे एक दीड इंचाचे गोळे करून हातावर थापावे (चिकटू नये म्हणून हाताला थोडे तेल लावून घ्यावे). मधे एक भोक पाडून गरम तेलात मध्यम आचेवर तळावेत. लाईट ब्राऊन रंग आल्यावर तेलातून काढून टिश्यू पेपरवर ठेवावे. गरमच खायला द्यावे. या वड्यांबरोबर टोमॅटो सॉस किंवा नारळाची चटणी छान लागते.

टीपाः १) नेहमी आदल्या दिवशीचा भात उरला की, फोडणी भात करण्यापेक्षा असे वडे केल्यास चवीत बदलही होतो आणि भात आनंदाने संपतो. २) आवडीप्रमाणे कणिक, बाजरी अशी पिठे घालू शकतो. ३) हे वडे गरमच चांगले खुसखुशीत लागतात. त्यामुळे शक्यतो लगेच खावेत. गार झाले की, मऊ पडतात. ४) लहान मुलांसाठी हे वडे बनवण्यासाठी त्यात मिरची घालू नये. तसेच ताज्या भाताचे बनवावे.





# महिला क्रिकेटसाठी आयसीसीचा मेगा प्लान पुढील ५ वर्षांसाठी फ्युचर्स टूर प्रोग्राम जाहीर

**महिला क्रिकेटचा जास्तीत जास्त प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी आयसीसीने एक नवी योजना आखली आहे. त्यासाठी महिला क्रिकेट संघ असलेल्या सर्व देशांसह इतरही नव्या देशांना एकत्र करून जागतिक महिला क्रिकेटसाठी एक ५ वर्षांचा मेगा प्लान आखला आहे. यामध्ये महिला वर्ल्डकपसह आशिया चषक, महिला चॅम्पियनशिप चषक यासारख्या मोठ्या स्पर्धांचा समावेश असेल. आयसीसीचा हा मेगा प्लान म्हणजे जागतिक महिला क्रिकेटसाठी तसेच क्रिकेटमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या महिला खेळाडूंसाठी एक सुवर्णसंधी आहे.**



■ लंडन

महिला क्रिकेट संघांचा फ्युचर्स टूर प्रोग्राम जाहीर केला आहे. आयसीसी महिला चॅम्पियनशिपच्या चौथ्या सीझनसाठी या एफटीपीमध्ये थोडे बदल करण्यात आले आहेत. या स्पर्धेसाठी संघांची संख्या वाढवण्यात आली आहे. आयसीसीच्या मते, २०२९ च्या महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेसाठी ११ संघ आयसीसी महिला चॅम्पियनशिपच्या चौथ्या चक्रात भाग घेतील. या स्पर्धेत झिम्बाब्वे पदार्पण करणार आहे, जे महिला क्रिकेटमध्ये अधिक जागतिक प्रतिनिधित्वाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. महिला चॅम्पियनशिपमध्ये, प्रत्येक संघ सध्याच्या चक्रासह इतर आठ संघांशी स्पर्धा करेल, चार घरच्या मैदानावर आणि चार इतर संघांच्या मायदेशात जाऊन सामने खेळेल. या संपूर्ण स्पर्धेत ४४ मालिका खेळवल्या जातील. ज्यामध्ये एकूण १३२ एकदिवसीय सामने खेळले जातील. म्हणजेच प्रत्येक मालिकेत तीन सामने खेळवले जातील. या स्पर्धेत पहिल्यांदाच सहभागी होत असताना झिम्बाब्वे संघ बांगलादेश, भारत, पाकिस्तान आणि दक्षिण आफ्रिकेचे यजमानपद भूषवणार आहे. याशिवाय झिम्बाब्वे संघ न्यूझीलंड, श्रीलंका, इंग्लंड आणि वेस्ट इंडिजचा दौरा करणार आहे. २०२५ ते २०२९ च्या एफटीपी सायकलमध्ये दरवर्षी एक आयसीसी महिला स्पर्धेचा समावेश असेल, २०२५ मध्ये आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषकापासून सुरुवात होईल. यानंतर २०२६ मध्ये आयसीसी महिला टी-२० विश्वचषक खेळवला जाईल. सर्वात मोठी अपडेट म्हणजे महिला क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच चॅम्पियन्स ट्रॉफीचा समावेश करण्यात आला आहे. आयसीसी महिला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२७ मध्ये आयोजित केली जाईल. यानंतर २०२८ मध्ये आयसीसी महिला टी-२० विश्वचषक खेळवला जाणार आहे.

## फुटबॉल सामन्यावर वीज कोसळली एका खेळाडूचा मृत्यू, ५ जखमी

■ चिलका

पेरू येथील एका फुटबॉल सामन्यादरम्यान अचानक वीज पडल्याने एका खेळाडूचा मृत्यू झाला. तर मॅच रेफरी गंभीररित्या जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. या मॅच रेफरीला तातडीने स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मॅच रेफरीवर उपचार सुरू आहेत. ही घटना पेरू येथे घडली आहे. पेरू येथील चिलका येथे ३ नोव्हेंबरला या सामन्याचे आयोजन करण्यात आले होते. जुवटेड बेलाविस्टा विरुद्ध फॅमिलाय चोका यांच्यात हा सामना खेळवण्यात येत होता. या सामन्यादरम्यान ही घटना घडली. पहिल्या हाफचा थरार सुरू होता. साऱ्यांचे लक्ष सामन्याकडे होते. जुवटेड बेलाविस्टा सामन्यात २-२ ने आघाडीवर होती. या दरम्यान हा सर्व प्रकार घडला. एकाएकी हवामान बदलले. त्यामुळे मॅच रेफरीने खेळ थांबवण्याचा निर्णय घेतला. तसेच खेळाडूंना मैदानाबाहेर जाण्याची सूचना केली. मॅच रेफरीने दिलेल्या सूचनेनुसार, खेळाडू मैदानाबाहेर जात होते. तेव्हा वीज कोसळली.

## २०३६ च्या ऑलिम्पिकच्या यजमानपदासाठी भारताचा दावा

■ नवी दिल्ली

भारताने ऑलिम्पिक गेम्स-२०३६ च्या यजमानपदासाठी दावा केला आहे. या अंतर्गत भारतीय ऑलिम्पिक संघटनेने आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक परिषदेला पत्रही लिहिले आहे. भारत सरकारने १ ऑक्टोबर रोजी इरादा पत्राद्वारे आयओसीकडे ऑलिम्पिक आयोजित करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. जर भारताने ऑलिम्पिक स्पर्धेचे यजमानपद मिळवले तर ते पहिल्यांदाच ऑलिम्पिक खेळांचे आयोजन केले जाईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून म्हणाले होते - 'भारत ऑलिम्पिक गेम्स-२०३६ चे आयोजन करेल.' तीन महिन्यांपूर्वी पॅरिस येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी एका रौप्यसह एकूण ६ पदके जिंकली होती. २०३२ पर्यंतचे यजमान ठरले, २०३६ साठी बोली लावली जाईल. २०३२ चे यजमानपद ऑस्ट्रेलियातील ब्रिस्बेन शहराला देण्यात आले आहे. तर, २०२८ ऑलिम्पिक लॉस एंजेलिस येथे होणार आहेत.

## प्रो कबड्डी लीग! पुणेरी पलटणचा गुजरातवर विजय

■ हैदराबाद



प्रो कबड्डी लीगमध्ये यंदा पुणेरी पलटण संघाची जबरदस्त कामगिरी होत आहे. पुणेरी पलटणने गुजरात जायंट्स विरुद्ध ४९ विरुद्ध ३० असा १९ गुणांनी विजय मिळवला. तर दुसरीकडे बंगळूरू बुल्सने तमिळ थलायवाचा ४ गुणांनी पराभव केला.

या विजयामुळे बंगळूरू बुल्स गुणतालिकेत १२ व्या स्थानावरून ११ व्या स्थानावर पोहोचला आहे. तर थलायवाची १२ व्या स्थानी घसरण झाली आहे.

पुणेरी पलटणच्या खेळाडूंनी चांगला खेळ केला. आकाश शिंदेने ११ गुण मिळवले तर अभिषेक नादराजन, गौरव खत्री यांनी ५ गुण मिळवले. गुजरात टायटनच्या गुमान सिंगने १३ गुण मिळवित चांगली कामगिरी केली.

दुसऱ्या सामन्यात बंगळूरू बुल्सच्या अजिंक्य पवारने ६ रेड पॉईंट घेतले. तर सुरेंद्र सिंग याने हाय फाईव्ह पूर्ण केले.

तमिळ थलयवाच्या नरेंद्र काडोल्ने ५ रेड पॉईंट घेतले. सामना काही प्रमाणात चुरशीचा झाला. यंदाच्या प्रो कबड्डी लीगला प्रेक्षकांकडून प्रचंड असा प्रतिसाद मिळत आहे.

## आजपासून बरेलीत व्हॉलीबॉल स्पर्धा

■ बरेली

उत्तर प्रदेशातील बरेलीत उद्यापासून १७ वर्षांखालील खेळाडूंसाठी व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. १० नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील ८०९ खेळाडू भाग घेणार आहेत. बरेलीमध्ये स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित स्पर्धेत उत्तर प्रदेशसह तेलंगणा, तामिळनाडू, गुजरात, गोवा आदी राज्यांचे खेळाडू भाग घेणार आहेत. त्यासाठी ८०९ खेळाडू तसेच त्यांचे प्रशिक्षक बरेलीत दाखल झाले असून, त्यांच्यासाठी शहरातील वेगवेगळ्या हॉटेल्समध्ये राहण्याची सोय करण्यात आली आहे. बरेली जिल्ह्यात प्रथमच ही स्पर्धा होत आहे.

## २४ नोव्हेंबरला रियाधमध्ये आयपीएलचा मेगा लिलाव



■ नवी दिल्ली

या मेगा ऑक्शनबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. मेगा ऑक्शन कधी आणि कुठे होणार याबाबतचे संभावित ठिकाण आणि तारीख समोर आली आहे. मेगा ऑक्शन रियाध येथे होणार आहे. मात्र याबाबत बीसीसीआयकडून कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, मेगा ऑक्शन नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. मेगा ऑक्शन नोव्हेंबर महिन्यातील २४ तारखेला होण्याची शक्यता आहे. यंदा आयपीएलला मेगा ऑक्शन होत आहे. त्यात सर्व फ्रँचायजींनी अनेक खेळाडूंना करारमुक्त केले आहे. त्यामुळे या खेळाडूंना आपल्या गोटात घेण्यासाठी चढाओढ पाहायला मिळणार आहे. श्रेयस अय्यर, ऋषभ पंत, के.एल. राहुल, मिचेल स्टार्क, मोहम्मद सिराज, युझवेंद्र चहल, मोहम्मद शमी, ग्लेन मॅक्सवेल, इशान किशन आणि इतर मोठ्या खेळाडू ऑक्शनमध्ये असणार आहे. आता या खेळाडूंना कोणती टीम आपल्या गोटात घेण्यात यशस्वी ठरणार? आणि त्या खेळाडूंना किती रक्कम मिळणार? याकडे साऱ्यांचे लक्ष असणार आहे.

## 'मुंबई स्पोर्ट्स'चा पुरस्कार वितरण सोहळा २८ नोव्हेंबरला

■ मुंबई

मुंबई स्पोर्ट्स या संस्थेने गेल्या वर्षीपासून क्रीडा क्षेत्रातील युवा खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी पुरस्काराला प्रारंभ केला. पहिल्याच 'स्पोर्ट्सपर्सन्स ऑफ द ईयर' पुरस्कार दिया चितळे (टेबल टेनिस), चिराग शेट्टी (बॅडमिंटन) यांना प्रत्येकी रु. एक लाख व सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. अपेक्षा फर्नांडिस (स्विमिंग), निशिका काळे (रिदमिक जिमनॅस्टिक), इशप्रीत सिंग चड्ढा (स्नूकर) व निखिल दुबे (बॉक्सिंग) या खेळाडूंचा सुध्दा सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला होता. २० २३-२४ च्या 'स्पोर्ट्सपर्सन्स ऑफ द ईयर' पुरस्कारासाठी नामांकन करण्यासाठी ९ नोव्हे. पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन मुंबई स्पोर्ट्सतर्फे करण्यात आले आहे. या पुरस्कार निवड समितीत मुंबईचे प्रमुख खेळाडू, क्रीडा विभाग, मुंबई स्पोर्ट्स जर्नलिस्ट असोसिएशन आणि मुंबई मराठी क्रीडा पत्रकार संघाचे एक प्रतिनिधी यांचा समावेश आहे. एम. सोमैया यांच्या अध्यक्षतेखालील जया शेट्टी, प्रदीप गंधे, उदय देशपांडे,




दत्तू फडतरे, संजय घरपुरे आणि संदीप कदम हे सदस्य असलेली समिती अंतिम नावे निश्चित करतील. निवड झालेल्या खेळाडूंना २८ नोव्हेंबरला सायंकाळी बंट संघ कुर्ला येथे पुरस्कार प्रदान केले जातील. या पुरस्कारासाठी मुंबईतील स्थायी रहिवाशी असलेला खेळाडू जो राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त खेळामध्ये प्राविण्य मिळवले आहे, असा कोणताही खेळाडू अर्ज करू शकतो. त्यासाठी क्रीडापटू स्वतः अथवा संघटना किंवा फेडरेशन क्रीडापटूंना अर्ज / नामांकित करू शकतात. अधिक माहितीसाठी ९८२१० ९६४०० या क्रमांकावर संपर्क साधावा. mumbaisports2021gmail.com या ई मेलवर संपर्क करून अर्ज भरू शकता.

# स्त्रियांसाठी स्वत:चा आत्मसन्मान महत्त्वाचा!



आत्मसन्मानाचा प्रश्न येतो तेव्हा स्त्रियांना 'रब से है दुआ' मालिकेतील न्यायालयातील नाट्य नक्की प्रेरणा देईल, असे अभिनेत्री **येशा रुघानी** सांगते. या मालिकेत ती वकिलाच्या भूमिकेत दिसतेय. याच पार्श्वभूमीवर तिच्याशी केलेली बातचीत...

**येशा, 'रब से है दुआ' मालिकेतील तुझ्या भूमिकेबद्दल काय सांगशील?**

एका स्त्रीमध्ये जन्मजात शक्ती आणि अनुग्रह असतो, पण जेव्हा तिच्या आत्मसन्मानावर प्रश्न उपस्थित केला जातो, तेव्हा स्वत:मध्ये परिवर्तन घडवून आणण्याची तिची शक्ती न थांबवता येणारी बनते. अशीच एक इबादत नावाची व्यक्तिरेखा मी झी टीव्हीवरील 'रब से है दुआ'मध्ये साकारतेय.

**या मालिकेत आता काय पाहायला मिळणार आहे?**

- आता मालिकेतील आगामी न्यायालयीन नाट्यामध्ये इबादतला एका विश्वासघाताला सामोरे जावे लागते. हा विश्वासघात केवळ तिची बहिण मन्नत (सीरत कपूर) हिच्याकडूनच नव्हे तर इबादतचा पती सुभान (धीरज धूपार) याच्याकडूनही होतो. मन्नत जेव्हा इबादतवर ती एक विश्वासघातकी पत्नी असल्याचा खोटा आरोप करते, तेव्हा तो काहीही न बोलता शांत उभा राहतो.

**हा विश्वासघात हे कथानकातले वळण आहे का?**

- हो तर... विश्वासघाताचा हा क्षण इबादतच्या प्रवासामध्ये एक महत्त्वपूर्ण वळण बनते. कारण ती आपल्या पतीवरील प्रेम आणि श्रद्धा याऐवजी स्वत:च्या आत्मसन्मानाला महत्त्व देते. हे कथानक केवळ मनोरंजनासाठी नसून समाजातील वेगाने बदलत असलेल्या लहरींचे शक्तीशाली प्रतिबिंब यातून दिसून येते, जिथे जेव्हा आत्मसन्मानाला ठेच पोहोचते तेव्हा स्त्रिया शांत राहात नाहीत.

**या मालिकेतून आत्मसन्मानाचे महत्वच दाखवले जातेय असे म्हणायचे ना?**

- हो. नक्कीच. या मालिकेच्या माध्यमातून आत्मसन्मान राखण्याच्या महत्त्वाबद्दल एक मजबूत सामाजिक संदेश पोहोचवण्याचा उद्देश्य असून इबादतच्या प्रवासामधून 'टॉक्सिक' नातेसंबंधांपासून दूर जाऊन आपला आत्मसन्मान राखणाऱ्या स्त्रियांच्या या चळवळीबद्दल ठळकपणे दिसून येते. आम्हाला हा संदेश द्यायचाय की, स्त्रियांनी कुठल्याही नात्यामध्ये आपल्या प्रतिष्ठेला सर्वोच्च प्राथमिकता द्यायला हवी. जेव्हा आत्मसन्मानाची बाब येते तेव्हा स्त्रियांना हा ट्रॅक प्रेरणा देईल.

**कोर्टाचा हा सीन किती आव्हानात्मक होता?**

- हे न्यायालयीन नाट्य हे एक अभिनेत्री म्हणून माझ्यासाठी आव्हानात्मक आहेच, पण त्यामुळे खूप समाधानही मिळाले. हे कथानक वाचल्यानंतर मला याचे महत्त्व पटले. त्यामुळेच मी हे महत्त्वपूर्ण संवाद बोलण्याचा सराव करण्यासाठी वेळ घेतला. सेटवरील वातावरणही भावुक होते आणि आमचे काम पूर्ण झाल्यानंतर तंत्रज्ञांनी टाळ्या वाजवून आमचे कौतुक केले. ते पाहून अंत:करण अक्षरश: भरून आले.




## मकरंद अनासपुरे नऊ वेगवेगळ्या भूमिकेत

सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे आता 'मूषक आख्यान' या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांची मने जिंकण्यासाठी सज्ज झाले आहेत. या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची आणि मध्यवर्ती भूमिकेची धुरा मकरंद अनासपुरे यांनी सांभाळली आहे. चित्रपटात मकरंद यांनी नऊ रंगाच्या अन् ढंगाच्या नऊ वेगवेगळ्या भूमिका साकारलेल्या आहेत. मराठीत हा प्रयोग पहिल्यांदाच होतो आहे. सुप्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील हिची ठसकेबाज लावणी हे 'मूषक आख्यान' चित्रपटाचे विशेष आकर्षण असणार आहे. भरत सावले, प्रकाश भागवत, नितीन कुलकर्णी, राजू सोनावणे, अमर सोनावणे, स्वाती देशमुख, रुचिरा जाधव यांच्याही चित्रपटात भूमिका आहेत. 'मूषक आख्यान' चित्रपट ८ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार आहे.

## 'फ्रीडम ॲट मिडनाइट' सीरिजचा टीझर दाखल

सोनी लिव्ह या ओटीटीवर १५ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या 'फ्रीडम ॲट मिडनाइट' या वेबसारिजचा तिसरा टीझर नुकताच लाँच करण्यात आलाय. यात इतिहासातील काही महत्त्वपूर्ण क्षण पाहायला मिळतात, जेथे महात्मा गांधी फाळणी रोखण्याचा शेवटचा प्रयत्न म्हणून सरदार वल्लभभाई पटेल यांना आवाहन करतात की त्यांनी मोहम्मद अली जिना यांना नेतृत्वपद द्यावे. या सीरिजमध्ये सिद्धांत गुप्ता (जवाहरलाल नेहरू), चिराग वोहरा (महात्मा गांधी), राजेंद्र चावला (सरदार वल्लभभाई पटेल), आरिफ जाकारिया (मोहम्मद अली जिना), ईरा दुबे (फातिमा जिना), मलिष्का मेंडोन्सा (सरोजिनी नायडू), राजेश कुमार (लियाकत अली खान), के.



सी. शंकर (व्ही. पी. मेनन), ल्यूक मॅकगिवनी (लॉर्ड लुईस माऊंटबॅटन), कॉर्डेलिया बुगेजा (लेडी एडविना माऊंटबॅटन) प्रमुख भूमिकेत आहेत.



## राजकुमार रावचा नवा लूक

'स्त्री २' चित्रपट हिट झाल्यानंतर अभिनेता राजकुमार राव याच्याकडे जाहिरातींचा ओघ देखील वाढला आहे. अनेक वड्या कंपन्या त्याला आपला ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नेमण्यासाठी उत्सुक आहेत. नुकतीच त्याची कोरा वाय एन एम या ब्रँडचा ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती झाली. या जाहिरातीमधील त्याचा पारंपरिक वेशभूषेतील नवा लूक सगळ्यांचे लक्ष वेधून घेत आहे.

## राम झाल्यानंतर प्रभास आता बनणार राक्षस



सुपरस्टार प्रभास याने आजवर प्रभु श्रीरामासारख्या भूमिका केल्या आहेत. प्रत्येक सिनेमात तो प्रेक्षकांना आवडला आहे. आगामी 'द राजा साब', 'स्पिरिट', 'सालार २', 'कल्की-२' आणि हनू राघवपुडी यांचा अनटायटल्ड सिनेमा या प्रत्येकात तो नायकच आहे. पण आता बहुधा त्याने राक्षस व्हायचं ठरवलं असावं. कारण 'हनुमान' फेम दिग्दर्शक प्रशांत वर्मा यांनी त्याला आपल्या नव्या सिनेमासाठी नुकतेच करारबद्ध केले आहे. या सिनेमाचे नावच 'राक्षस' असे आहे. 'हनुमान' सिनेमानंतर दिग्दर्शक प्रशांत सुपरहीरो युनिवर्सचेच चित्रपट बनवणार आहेत. यातला त्यांचा पुढचा सिनेमा 'जय हनुमान' आहे. त्यात ऋषभ शेट्टी मुख्य भूमिकेत आहे. पण त्यातच प्रशांत यांनी प्रभासला घेत 'राक्षस' सिनेमाची घोषणा केली आहे. म्हटलं जातंय की या सिनेमासाठी त्यांनी आधी रणवीर सिंहला विचारले होते. रणवीरही यासाठी उत्सुक होता. हैदराबादला जाऊन त्याने फर्स्ट लुकही शूट केला होता. पण नंतर रणवीरने या प्रोजेक्टमधून माघार घेतली आहे.

## समांथाने ट्रोलर्सना सुनावले

बॉलीवूडसह साऊथ इंडस्ट्री गाजवणारी अभिनेत्री समांथा नुकतीच एका कार्यक्रमात स्पॉट झाली. या कार्यक्रमाचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून बारीक दिसण्यावरून तिला ट्रोल केले जात आहे. मात्र, समांथा हिने देखील ट्रोलर्सना जशास तसे उत्तर देऊन त्यांची बोलती बंद केली. एका युजरने तिला वजन वाढवण्याचा सल्ला दिला त्यावर समांथा म्हणाली, मी सध्या एंटी-इंफ्लेमेटरी डाएटवर आहे. जो मला वजन वाढवण्यापासून रोखतो. माझ्या शरीराला सध्या त्याची आवश्यकता आहे. लोकांना जज करणे थांबवा. जगा आणि जगू द्या!






## 'बाप कुणाचा ताप कुणा!' रंगभूमीवर लवकरच

मराठी रंगभूमीवर 'बाप कुणाचा ताप कुणा...!' हे धमाल नाटक लवकरच येतंय. भरपेट मनोरंजन करणाऱ्या या नाटकाचा शुभारंभाचा प्रयोग शुक्रवार, ८ नोव्हेंबर रोजी रात्री शिवाजी मंदिरात रंगणार आहे. नाटककार श्रीनिवास भणगे यांनी नाटक लिहिले असून कुमार सोहोनी यांनी हे नाटक दिग्दर्शित केलंय. या नाटकात विजय गोखले, संतोष पवार, धनश्री काडगावकर, प्रशांत निगडे, वरदा साळुंके, श्रुती पुराणिक व दुर्गेश आकेरकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. कुमार सोहोनी यांचे दिग्दर्शक म्हणून हे १२०वे नाटक. या नाटकाचे संगीत अशोक पत्की यांचे असून नेपथ्य राजन भिसे यांचे आहे. कुमार सोहोनींची प्रकाशयोजना, पूर्णिमा ओक यांची वेशभूषा आणि किशोर पिंगळे यांची रंगभूषा आहे. निर्माते सचिन व्ही. यू. हे आहेत. सी. टी. निर्मित व स्मित हरी प्रॉडक्शन्स प्रकाशित हे नाटक रंगभूमीवर धमाल उडवणार हे नक्की.

## लाडक्या लेकीसाठी सुनील शेट्टी यांची भावूक पोस्ट





अभिनेते सुनील शेट्टी यांनी आपली मुलगी अथिया हिच्या वाढदिवसानिमित्त तिचे लहानपणीचे फोटो शेअर करून तिला हटके अंदाजात वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सुनील शेट्टी यांनी तीन फोटो शेअर केले असून त्यातील एका फोटोत ते दोन्ही मुलांसोबत पोझ देताना दिसत आहेत. तर बाकीच्या दोन्ही फोटोत अथियाच्या बालपणीचे क्यूट मोमेंट पाहायला मिळत आहेत. सोबत सुनील शेट्टी यांनी लाडक्या लेकीसाठी भावूक पोस्ट देखील लिहिली आहे. यात त्यांनी सर्वात आवडती व्यक्ती आणि बेस्ट फ्रेंड म्हणून अथियाचा उल्लेख केला आहे.

## भन्साळींच्या सिनेमाचे शूटिंग ७ नोव्हेंबरपासून

संजय लीला भन्साळी यांचा की नई फिल्म 'लव अ‍ॅण्ड वॉर' हा नवा सिनेमा घोषणेपासूनच चर्चेचा विषय ठरला आहे. रणवीर कपूर, आलिया भट्ट आणि विक्की कौशल अशी दमदार स्टारकास्ट असलेल्या या सिनेमात प्रेम त्रिकोण एका वेगळ्या अंदाजात पाहायला मिळणार आहे. या सिनेमाच्या पटकथेवरील काम पूर्ण झाले असून ७ नोव्हेंबरपासून याच्या प्रत्यक्ष चित्रीकरणाला मुंबईत सुरुवात होणार आहे. सर्वात याधी या शूटमध्ये रणवीर कपूर सामील होतोय. तो सिनेमाचा ओपनिंग सीन शूट करणार आहे. विकी कौशलचे शूटिंग पुढच्या आठवड्यात केले जाईल, तर आलिया थेट डिसेंबरमध्ये यात सहभागी होणार आहे, असे सूत्रांनी सांगितले. हा सिनेमा २०२६ साली प्रदर्शित करण्याची योजना आहे. म्हटलं जातंय की हा सिनेमा १९६४ साली आलेल्या 'संगम' या सिनेमाचा रिमेक आहे. भन्साळींना एक संगीतमय सिनेमा करायचा होता, त्यामुळे त्यांनी हा रिमेक हातात घेतल्याचेही बोलले जातेय.



# नवाकाळ शब्दकोडे-१०६७



**आडवे शब्द –**

४. शरीर ७. डुक्कर ९. हंगाम, फुलोरा ११. लवचिकपणा १५. कणीक आणि तुरीच्या वरणाचा पदार्थ १८. लिव्हरचा एक रोग १९. खिलाडूवृत्ती नसलेल्यांची खेळी- xxचा डाव २०. मुत्सद्देगिरी २२. फोटो २३. घ्राणेंद्रिय २४. शव २७. समशेर २९. घायाळ ३३. सुळका, कडा ३४. स्तंभ ३६. एक शेंगभाजी ३७. तल्लीन ३८. पैसेवाला ४०. प्रदेश ४२. विपरीत चाल ४३. ढग ४५. ओतीव लोखंड, मराठवाड्यातील एक जिल्हा ४७. छोटा ४९. जेवण ५०. पळून गेलेला ५२. महादेव ५४. प्रतिबंध ५५. घोकून घोकून पाठ करणे ५८. बस्तान ५९. अन्नाचा घास ६०. सरकारी ६२. वेगळे होणे, ताटातूट ६४. फाजील ६५. आर्द्रता ६६. शेवट ६७. अप्रीती, नापसंती ६८. भाजलेले हरभरे, फुटाणे ६९. वृद्धी ७०. मोफत ७२. राष्ट्र ७३. भाकरीचे एक धान्य ७५. वेदना ७६. केसांच्या तेलातील उष्ण वनस्पती ७७. जीत ७८. उंची दर्जाचे ७९. मनमुराद ८२. उसाचे कांडके ८३. मधुर ८६. खर्च वगैरे गोष्टी वाचवणे, पैसे साठवणे ८८. भगवान शंकर ९१. मनमोकळा ९४. साडीचा पदर ९६. पृथ्वी ९७. अनुचित ९८. अरण्य १००. स्वच्छंदी १०१. गुप्तचर १०२. तल्लीन, एकचित्त १०३. मोठा १०६. गवताचे पान १०८. सुतारकामाचे एक अवजार १०९. देव या चार ठिकाणी म्हणजेच सर्वत्र असतो ११०. लुच्चा, खोटारडा १११. झोपडी

**उभे शब्द –**

१. दोलायमान २. आपुलकी ३. खेद ५. याग ६. तीर, शर ७. फुलांचा अलंकारविशेष ८. चटकन योग्य प्रत्युत्तर देणारा ९. दुष्कीर्ती १०. पायजम्याचे जाडेभरडे कापड १२. संतापाची लाट १३. दुर्दशा १४. घाई १६. राजाची प्रजा १७. फर्मान २१. रावणाशी लढताना मेलेला पक्षी २५. लिखाण २६. पाठीवर हाताने केलेला हलका प्रहार २८. विवाह ३०. कठोर शब्दात कानउघाडणी ३१. काढा ३२. चिथावणी ३५. वात, वारा; हनुमानाचे एक नाव- xxxपुत्र ३७. विपुल धन ३९. अद्दल घडवणे ४१. सेतू ४३. टेबल ४४. जोरदार युद्ध ४६. पडीक जागा, प्लॉट ४८. आंब्याची एक महाग जात ४९. शिवशंकराच्या स्वभावाचा विशेष ५१. छोटी भाकरी ५३. अंत ५४. उत्पन्न ५६. हस्तभूषण ५७. अब्रू ६०. सत्कारादाखल दिले जाणारे उंची उत्तरीय ६१. किडा ६२. किफायतशीर ६३. सुरेल, कर्णमधुर ६४. तपासणी ६५. आकर्षण ६७. नृत्य ६९. लाकूड खाणारा कीटक ७०. व्यर्थ ७१. जाड रेशमी कापड ७३. महिला, स्त्री ७४. शेपूट ७६. पैसेवाला ७८. कपाळ ८०. आटा, बेसन, मेथी आणि मसाले वापरून केलेला गुजराथी न्याहारीतला पदार्थ ८१. उट्टे ८२. तळघरात धान्य साठवण्यासाठी केलेली जागा ८४. साधर्म्य ८५. मूल्य, किंमत ८७. उंची वस्त्राचा मऊ पोत ८९. किळस ९०. प्रारब्ध ९१. दिवस ९२. हांजीहांजी ९३. खळबळजनक ९५. कृष्णाचे भूपाळीतले नाव ९७. कौतुक ९८. अवांतर, इतर ९९. ताकीद १०२. अंगवळणी पडलेली गोष्ट १०४. हाक १०५. सहावी तिथी १०६. तहान १०७. फोडणीतील, तळणातील मुख्य घटक •

**नवाकाळ कोडे क्रमांक १०६६ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. अदमास ४. बाह्य ५. सुटवंग ८. मस १०. भक्कम ११. मजूरी १२. जस्त १३. नाहक १५. लाल १६. सोय १७. कथन १९. चिनीमाती २०. वर्धिष्णू २१. शूर २३. सूत्र २४. कनक २६. गोधडी २७. मान्यता २८. रक्त २९. मोती ३१. कमला ३४. भिडू ३५. चोळी ३६. समरस ३९. बाजी ४१. गतानुगतिक ४२. सारी ४३. साहसी ४४. वलय ४६. जव ४७. बासरी ४८. अजस्र ५०. निश्चय ५२. डहाळी ५४. पारोशी ५६. वीरगती ५७. सलामी ५९. आटवल ६०. आठवण ६१. मांजा ६२. तारा ६४. बिचवा ६६. वारसा ६९. मका ७१. निरर्गल ७३. गरज ७४. गमजा ७६. हिरामण ७७. वचक ७९. बल्लव ८०. नीरज ८२. चमेली ८४. वारकरी ८५. सल्ला ८६. गराडा ८८. तोळामासा ९०. पाणी ९१. सूड ९२. गजर ९३. हकीम ९५. लोह ९६. शत ९८. बाही ९९. डाक १००. वातड १०१. कणीदार १०२. असमाधानी १०३. गोवरी

**उभे शब्द :** १. अक्कलशून्य २. दम ३. समयसूचकता ४. बारीक ५. सुस्त ६. वंदनीय ७. मोह ९. सहिष्णूता १०. भला १२. जनन १३. नातीगोती १४. कवडी १८. थकवा २२. रताळे २५. करडू २७. मागोवा २९. मोळी ३०. क्षर ३२. मनुज ३३. लागवड ३४. भिकबाळी ३५. चोरी ३६. सहस्रवीर्य ३७. मसी ३८. सखी ४०. जीवश्चकंठश्च ४१. गय ४२. सारीपाट ४३. साज ४५. लय ४८. अशील ४९. रंगमंच ५१. झेला ५३. हानी ५५. रोवळी ५७. सणवार ५८. मीमांसा ५९. आराम ६३. कुरण ६४. बिलवर ६५. वाटेकरी ६७. रजनी ६८. सोम ७०. काहिली ७१. निमताळा ७२. सांबर ७३. गवसणी ७४. गजरा ७५. जाच ७८. चकचकीत ८१. रगड ८३. मेहरबानी ८४. वासा ८७. डाग ८८. तोरा ८९. मारेकरी ९०. पाहणी ९१. सूत ९३. हवाला ९४. मडके ९५. लोक ९६. शर ९७. मूस ९९. डाव

## मुंबई महापालिकेचे जनक व भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एक संस्थापक

# सर फिरोजशाह मेहता

**मुंबईच्या जडणघडणीत पारसी समाजाचे मोलाचे योगदान आहे. अनेक मोठमोठी दानशूर व्यक्ती या समाजात होऊन गेल्या. त्यापैकी एक म्हणजे सर फिरोजशहा मेहता! ते एक नामांकित वकील, उत्तम प्रशासक आणि प्रखर राष्ट्रवादी होते. त्यांचे वडील मेरवजी मेहता यांचा कोलकात्याला व्यापार होता, पण व्यापारानिमित्त ते अधूनमधून मुंबईत राहात असत. फिरोजशहा मेहता यांचे सर्व शिक्षण मुंबईत झाले.**



**एलफिन्स्टन** कॉलेजमधून एम.ए. होऊन ते इंग्लंडला बॅरिस्टर होण्यासाठी गेले. तेथील चार वर्षांच्या वास्तव्यात पितामह दादाभाई नौरोजी यांचा प्रभाव पडला. ते बॅरिस्टर होऊन १८६८ मध्ये हिंदुस्थानात आले व मुंबईत त्यांनी वकिली सुरू केली. १८६९ मध्ये त्यांनी दादाभाई नौरोजींच्या ईस्ट इंडिया असोसिएशनची शाखा म्हणून बॉम्बे असोसिएशन मुंबईत सुरू केली. गोऱ्याज लोकांच्या मिरासदारीविरुद्ध त्यांनी प्रभावी प्रचार केला. सुरतच्या आंदोलनातून उद्भवलेल्या दंगल केसमध्ये आरोपींच्या वतीने समर्थपणे उभे राहून फिरोजशहांनी कीर्ती मिळवली. अनेक महत्त्वाचे प्रश्नप हाती घेऊन त्यांनी वकिलीबरोबर राष्ट्रीय जागृतीचेही कार्य केले. १८७२ च्या मुंबई महानगरपालिका विधायक कायद्यावर त्यांच्या सूचनांची पूर्ण छाप होती. यामुळे त्यांना 'मुंबईतील नागरी शासनाचे पिता' हे सार्थ नाव मिळाले.

१८७३ मध्ये ते महानगरपालिकेचे आयुक्त झाले. १८७८ ते १८८० या काळात वृत्तपत्रांची गळचेपी करणारा व्हर्नॅक्युलर प्रेस ऍक्ट आणि ब्रिटिश कापडाला हुकमी बाजारपेठ चालू राहावी यासाठी आयात करातून देण्यात आलेली सूट या दोन प्रश्नां वर त्यांनी सनदशीर मार्गाचा अवलंब केला. १८८४-१८८५ या काळात ते मुंबई महानगरपालिकेचे महापौर होते. बॉम्बे असोसिएशनचे बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशनमध्ये रूपांतर झाले. त्यावेळी या संस्थेचे ते स्वत:, न्यायमूर्ती तेलंग व दिनशा एडलजी वाच्छा हे पहिले सरचिटणीस झाले. याचवर्षी मुंबईत भरलेल्या पहिल्या काँग्रेस अधिवेशनात त्यांनी व त्यांच्या सहकार्यांनी हिरिरीने भाग घेतला. त्यांची राष्ट्रीय नेत्यांमध्ये तेव्हापासून गणना होऊ लागली. जनमत तयार करण्यासाठी त्यांनी 'बॉम्बे क्रॉनिकल' हे वृत्तपत्रही सुरू केले. परदेशी राजवट हिंदुस्थानची कशी लूट करते यावर त्यांनी अभ्यासपूर्ण लेख लिहिले. त्यांच्या कारकीर्दीत मुंबई शहरात अनेक सुधारणा होऊन या महानगरीचा कायापालट झाला. ते महापालिकेच्या कारभारात इतके लक्ष घालीत की, महापालिका म्हणजे फिरोजशहा मेहता व फिरोजशहा मेहता म्हणजे महापालिका अशी म्हण पडली होती. ते राजकारणात नेमस्त असले तरी अत्यंत मानी व निर्भय होते. लॉर्ड कर्झन वायली हे हिंदुस्थानचे व्हॉईसराय होते तेव्हाची गोष्ट. कर्झन हे मुंबईला आले असता त्यांच्या सन्मानार्थ अनेक जाहीर मेजवान्या दिल्या गेल्या, पण फिरोजशहा मेहता एकाही जाहीर मेजवानीला हजर राहिले नाहीत. फक्त त्यांच्या एका मित्राने लॉर्ड कर्झन यांना खासगी मेजवानी दिली. त्यावेळी शिष्टाचार म्हणून ते मेजवानीला हजर होते, पण लॉर्ड कर्झन यांच्या शेजारीच त्यांची खुर्ची असून त्यांनी व्हॉईसरायकडे पाहिले नाही. तेव्हा व्हॉईसरॉय फिरोजशहांच्या वर्तनामुळे गोंधळून गेले. ते फिरोजशहांजवळ गेले व त्यांना म्हणाले, 'तुमचा माझ्यावर इतका राग का?' यावर फिरोजशहा म्हणाले, 'आपण ऑक्स्फर्ड विद्यापीठातील जुने दोस्त. तुम्ही व्हॉईसरॉय म्हणून आलात त्यावेळी मी तुमचा मान राखण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला, पण तुम्ही उर्मट बनलात. तुम्ही माझी पर्वा केली नाही. माझ्यातही पाणी आहे हे आपण विसरू नये.' यावर लॉर्ड कर्झन यांनी फिरोजशहांची क्षमा मागितली.

१८९० मध्ये काँग्रेसच्या ६ व्या अधिवेशनसाठी त्यांची अध्यक्षपदी निवड झाली. पुढे ते मुंबईच्या कायदे मंडळाचे सदस्य झाले. शेतकर्यांठची सावकारी पाशातून मुक्तता करण्यासाठी त्यांनी विविध उपाय सुचवले. तसेच शासकीय खर्चात कपात करावी यासाठी आग्रह धरला. विश्वविद्यालये स्वायत्त असावीत, त्यावर शासकीय दडपण असू नये अशा मागण्या केल्या. १८९४ मध्ये इंग्रज सरकारने त्यांना सी.आय.ई. हा किताब दिला होता. १९११ मध्ये त्यांच्या पुढाकाराने सेंट्रल बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. १९१५ साली मुंबई विश्व विद्यालयाचे उपकुलगुरू म्हणून त्यांची नियुक्ती झाली. याच वर्षी विद्यापीठाने त्यांना एल. एल. डी. ही मानद पदवी दिली. फिरोजशहा मेहता यांचे ५ नोव्हेंबर १९१५ रोजी निधन झाले. त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून त्यांचा पूर्णाकृती पुतळा आजही मुंबई महापालिकेसमोर उभा आहे. शिवाय संसद भवनाच्या लॉबीतही त्यांचे तैलचित्र आहे.

# तुम्ही लाडकी बहीण योजना आणली आम्ही मुलांना शिक्षण मोफत देणार आहोत



पान १ वरून

अदानीला मदत करतोय, जो कोणी भाजपाला मदत करतोय, जो कोणी मोदी-शहांच्या पालख्या वाहतोय तो महाराष्ट्राचा दुश्मन आहे हे मी जाहीरपणे सांगतो. राधानगरी मतदारसंघ गद्दारांना गाडल्याशिवाय राहणार नाही. मधल्या काळात ग्रहण लागले, त्यासाठी मी हात जोडून माफी मागतो. ती चूक माझ्याकडून झाली. ज्याला सगळे काही दिले त्यांनी गद्दारी केली. आता माझ्याच नव्हे तर जनतेच्याही पाठीत वार करून छातीतही वार करायला आपल्यासमोर ते उभे राहिले आहेत. सगळे देऊनसुद्धा शिवसेना नावाच्या आईवर वार करणारा तुमचा माणूस होऊ शकतो का?

ते पुढे म्हणाले की, ही निवडणूक महाराष्ट्राची ओळख ठरवणारी निवडणूक आहे. महाराष्ट्र कुणाचा? महाराष्ट्र शिवाजी महाराज, शाहु फुले, आंबेडकरांचा की, मोदी-शहांचा ही ओळख ठरवणारा ही निवडणूक आहे. एक भाऊ आला तर ठीक आहे, पण तीन तीन भाऊ येत आहेत. एका बाजूला देवा भाऊ , दुसरीकडे दाढी भाऊ, तिसरीकडे जॅकेट भाऊ. तुमचा भाऊ कोणता? हे सर्व खाऊ भाऊ आहेत. उद्या राहुल गांधी मुंबईत येत आहेत. आम्ही उद्या महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रकाशित करत आहोत. पण मी आजच सांगतो की, आज राज्यात सरकारी शाळांमध्ये मुलींना शिक्षण मोफत आहे. आता आम्ही मुलांनाही तेवढंच मोफत शिक्षण देणार आहोत. कारण, मुलगा आणि मुलगी माझ्या महाराष्ट्राचे आधारस्तंभ आहेत. महाराष्ट्र सरकार मुलींना मोफत उच्च शिक्षण देत आहे, मग मुलांनी काय गुन्हा केला आहे? आम्ही मुलांनाही मोफत शिक्षण देणार आहोत. पोलीस ठाण्यात गेल्यानंतर महिलांना अनेकदा तक्रार कुठे करायची हेच कळत नाही. त्यामुळे मविआचे सरकार आल्यास राज्यात तातडीने महिला पोलिसांची भरती केली जाईल. राज्यात विविध ठिकाणी पोलीस ते वरिष्ठ पदांवर महिला अधिकारी कार्यरत असणारी विशेष पोलीस ठाणी सुरू केली जातील.

ते पुढे म्हणाले की, आमचे सरकार आल्यास राज्यातील शेतकऱ्यांना हमीभाव दिला जाईल. महाविकास आघाडीचे सरकार पडले नसते तर यंदाच्या वर्षी शेतकरी कर्जमुक्त झाला असता. आता आम्ही सत्तेत नाही. उद्या सत्तेत आल्यानंतर पुन्हा शेतीमालाला हमीभाव दिला जाईल. जसे आपले मनोहर जोशी मुख्यमंत्री होते तेव्हा पाच वर्षांत पाच जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवले होते. महागाई वाढू दिली नव्हती तसे आज मी जाहीर करतो की, महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर पुढची पाच वर्षे डाळ, तेल, साखर, तांदूळ सारख्या जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवणार आहोत.

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते अनावरण व्हायला पाहिजे म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यात आला, पण तो पुतळा आठ महिन्यांतच कोसळला. ही तुमची छत्रपती शिवरायांबद्दल भक्ती आहे का? कोश्यारी राज्यपालपदी बसले होते, ते महाराजांच्या विरोधात बोलले. त्यांच्याविरोधात आपण मोर्चा काढला. भाजपाने, शिंदेंनी त्यांचा निषेध केला नाही. महाराजांचा अपमान केला तर काय झाले, माझा तर अपमान नाही ना केला, असे मोदी म्हणाले असतील. महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर आम्ही प्रत्येक जिल्ह्यात महाराजांचे भव्य मंदिर उभारणार. सुरतलाही मंदिर उभारून दाखवीन. येताना तुमच्या सर्व नेत्यांना घेऊन या आणि महाराजांसमोर नाक घासा. 'जय शिवराय' हा आमचा जयघोष असेल. लोकसभा निवडणुकीवेळी आमच्या मशाल प्रचार गीतातील 'जय भवानी' शब्द काढण्याचा निर्णय तुम्ही दिलात. पण अद्याप तुम्ही माझ्यावर कोणतीही कारवाई करू शकला नाहीत. तुम्ही माझ्यावर कारवाई करा. मग संपूर्ण महाराष्ट्र तुमच्यावर कारवाई करील.

इंग्रजांना विरोध करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरत लुटली होती. त्याच सुरतेमध्ये महाराष्ट्राच्या पाठीत वार करून तुम्ही गद्दार घेऊन गेला होता. त्याच सुरतमध्ये शिवाजी महाराजांचे मंदिर बांधणार आहे. ५० खोके घेऊन तुम्ही महाराष्ट्र विकत घेऊ शकत नाही. कितीही जन्म गेले तरी माझा महाराष्ट्र तुमच्या खोक्यात मावू शकणार नाही. हे सरकार टक्केवारीचे, खोके सरकार आहे.

# शहापुरात आत्महत्येच्या दोन घटनांनी खळबळ

■ शहापूर

**अज्ञात** कारणावरून एका दाम्पत्याने तर दुसरा कर्जाचा धसका घेऊन नैराश्य आलेल्या एका इसमाने गळफास लावून आत्महत्या केल्याच्या दोन वेगवेगळ्या घटना शहापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने खळबळ उडाली आहे. टेंभा येथील दीपक घोडविंदे (२७) व त्याची पत्नी दिव्यांका (२३) या दाम्पत्याने घरात कोणी नसताना हॉलमधील आडव्या खांबाला एकाच साडीने गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी शहापूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, याबाबत चौकशी व्हावी, अशी मागणी मुलीच्या वडिलांनी शहापूर पोलिसांकडे केली आहे. तर एका बँकेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करता येत नसल्याने कर्जाचा धसका घेऊन नैराश्य आलेल्या एका गृहस्थाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना वाफे येथे घडली. दुसऱ्या घटनेत शहापूर लगत असलेल्या वाफे येथील जयेश कुलकर्णी (४९) याने एका बँकेकडून घेतलेल्या आठ लाख रुपयांच्या कर्जाची परतफेड करता येत नसल्याने त्याचा धसका घेऊन राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

**जाहीर सूचना**

सर्वसामान्य जनतेस मोठ्या प्रमाणात कळविण्यात येते की, श्री. विनित एस. मोदी हे अशोक नगर को-ऑप हौसिंग सोसायटी लि. मधील प्लॉट क्र. ०७ चे भागधारक व सदस्य आहेत जे एन.एस. रोड क्र. ११, जुहू स्कीम, विलेपार्ले (पश्चिम), मुंबई- ४०० ०४९ येथे स्थित आहे आणि तसेच त्यांनी भाग प्रमाणपत्र क्र. ०६ अंतर्गत सदर सोसायटीने जारी केलेले ५ शेअर्स देखील धारण केले आहेत (यापुढे सदर प्रिमायसेस म्हणून संदर्भित) मूळ भाग प्रमाणपत्र हरवल्याने उपरोक्त सोसायटीला दुय्यम भाग प्रमाणपत्र जारी करण्यासाठी अर्ज केला आहे कारण ते योग्य परिश्रमानंतर शोधण्यायोग्य नाही.

प्रक्रियेनुसार, सोसायटी श्री. विनित एस. मोदी यांच्या नावे दुय्यम भाग प्रमाणपत्र जारी करण्याच्या प्रक्रियेत आहे, म्हणून सदर प्लॉट आणि सदर शेअर संदर्भात कोणत्याही व्यक्ती किंवा इतर दावेकर्ते/आक्षेप घेणारे किंवा आक्षेप घेणाऱ्यांकडून दावे आणि/किंवा आक्षेप मागवणारी जाहिर सूचना सादर करावी, सध्याची सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत, सदर प्लॉट आणि सदर शेअर्सच्या संदर्भात त्याच्या/तिच्या/त्यांच्या दाव्यांच्या/आक्षेपांच्या समर्थनार्थ इतर पुराव्यांसह आणि अशा कागदपत्रांच्या प्रती खाली नमूद केलेल्या पत्त्यावर खाली स्वाक्षरीकर्त्यास पाठवावे. वरील विहित कालावधीत कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, सोसायटी सदर प्लॉटच्या संदर्भात दुय्यम भाग प्रमाणपत्र जारी करेल.

(श्री. मनोज के. पांडे)
वकिल, उच्च न्यायालय
३०८, बिझनेस क्लासिक, एस.व्ही. रोड समोर,
चिंचोली बंदर रोड, मालाड (पश्चिम),
मुंबई-४०० ०६४

# माझ्या वडिलांची हत्या हे षड्यंत्र

पान १ वरून- त्यांचे नेतृत्व मोठे होऊ नये, त्यांची अडचण होऊ नये म्हणून हे षड्यंत्र रचले असावे. मी त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून चालत आहे. मी माझ्याविरोधात केलेल्या षड्यंत्राबद्दल कोणालाही काहीही विचारले नाही. मला खासदार केले नाही म्हणून आमदार करा अशी मागणीही केली नाही. माझा काम करण्यावर विश्वास आहे. मी काही कुणाला सांगण्यास किंवा विचारण्यास जात नाही. लोकसभा निवडणुकीत माझे तिकीट कापण्यात आले. ते महाराष्ट्रातून झालेले एक षड्यंत्र होते. पूनम महाजन यांनी अनेक वर्षांनंतर ज्येष्ठ भाजपा नेते प्रमोद महाजन यांच्या मृत्यूच्या दिवसाची आठवण काढली. आजपर्यंत विरोधी पक्षातील एकानेही या घटनेचा उल्लेख कधीही भाजपावर टीका करण्यासाठी केला नाही हे विशेष.

# राहुल गांधींच्या संविधान सन्मान! संमेलनात प्रसारमाध्यमांवर बंदी

पान १ वरून

यांनी राहुल गांधींवर टीका केली. ते म्हणाले की, नागपुरातील संविधान सभा ही राहुल गांधी संविधानासाठी नाही तर मतांसाठी घेत असल्याने माध्यमांची राहुल गांधींना भीती वाटते. मात्र हा आरोप काँग्रेसकडून फेटाळण्यात आला आहे. हा कार्यक्रम ओबीसी युवा मंचचा असल्याने तो आयोजकांचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर नागपूरमध्ये संविधान सन्मान संमेलनाच्या कार्यक्रमात माध्यमांना मज्जाव केल्यामुळे हा मुद्दा राजकीयदृष्ट्या चर्चेचा ठरत आहे.

## माध्यमांना बंदी ही अफवा

पान १ वरून – असून, ते माध्यमांना पुरवण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले. ते म्हणाले की, संविधान सन्मान संमेलन हा कार्यक्रम रेशीमबागेत कवीवर्य सुरेश भट सभागृहात होत आहे म्हणून बिथरलेल्या भाजपाने खोटी माहिती पसरवण्याचा प्रकार केला आहे. राहुल गांधी हे प्रसारमाध्यमांना नेहमीच सामोर जातात. पत्रकार परिषदा घेतात, मुलाखती देतात आणि प्रसार माध्यमांच्या स्वातंत्र्यासाठी आवाजही उठवत असतात. याच्या उलट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ वर्षांत एकही पत्रकार परिषद घेतली नाही. नरेंद्र मोदी प्रसार माध्यमांना घाबरतात का? भाजपाच्या काळात माध्यम स्वातंत्र्यांच्या बाबतीत भारत तळाला आहे. माध्यमांना गोदी मीडिया का संबोधले जात आहे. टीव्हीवर होणाऱ्या चर्चा एकांगी होत असतात हे सुप्रीम कोर्टाला का म्हणावे लागले, याचे भाजपाने उत्तर द्यावे. आपल्या एका संदेशात त्यांनी महिलांकडे वाकड्या नजरेने बघणाऱ्यांना फाशी देणार या एकनाथ शिंदे यांच्या विधानाचाही समाचार घेतला. एकनाथ शिंदे हे संजय राठोड व वामन म्हात्रे यांनाही फाशी देणार का, असा सवालही त्यांनी केला.

# नवाकाळ

• पुणे । बुधवार ६ नोव्हेंबर, २०२४ • पान -८


## टोचा

**शरद पवार म्हणाले की, राज्यसभेची माझी मुदत लवकरच संपणार आहे. पुन्हा राज्यसभेवर जायचे की नाही याचा विचार करीन. कारण आता कुठेतरी थांबले पाहिजे. याचा अर्थ शरद पवार आता निवृत्त होणार असा धरला जात आहे. पण हे तर मतांचे राजकारण वाटते. कारण हेच वक्तव्य त्यांनी मागे एकदा केले. नंतर माघार घेतली आणि पुढे फुटीचा खेळ झाला. त्यामुळे शरद पवारांच्या वक्तव्यावर विश्वास ठेवण्याची घोडचूक महाराष्ट्र यावेळी करील असे वाटत नाही.**

## थोडक्यात...

### राजू पारवे यांचा भाजपा प्रवेश! शिंदे गटाला धक्का

**नागपूर** - माजी आमदार राजू पारवे यांनी आज शिवसेना शिंदे गटाची साथ सोडली. त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर निवासस्थानी भाजपात प्रवेश केला. गेल्या लोकसभेला राजू पारवे यांनी काँग्रेसची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यावेळी त्यांनी आमदारकीचा राजीनामा देऊन लोकसभा निवडणूक लढवली होती. रामटेक मतदारसंघातून त्यांनी लोकसभा निवडणूक लढवली. मात्र काँग्रेसच्या श्यामकुमार बर्वे यांनी त्यांचा पराभव केला. उमरेड मतदारसंघ भाजपाला सुटल्यानंतर राजू पारवे यांनी सुरुवातीला बंडखोरीचा पवित्रा घेतला होता. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी शिष्टाई केल्यानंतर त्यांच्या शब्दावर कालच राजू पारवे यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज मागे घेत भाजपाला उमरेड मतदारसंघात दिलासा दिला होता. आज तेच राजू पारवे देवेंद्र फडणवीस यांची भेट घ्यायला त्यांच्या घरी पोहोचले आणि त्यांनी वेगळा निर्णय घेत भाजपाचा झेंडा हाती घेतला आहे.

### रासपा उमेदवार गोविंद जेठेवारांचा आत्महत्येचा प्रयत्न

**नांदेड** - नांदेड जिल्ह्यातील किनवट विधानसभेतील रासपचे उमेदवार गोविंद जेठेवार यांनी औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला आहे. ही घटना उघड झाल्यावर एकच खळबळ उडाली आहे. गोविंद यांनी असा प्रयत्न का केला असावा, यामागे काही राजकीय किंवा सामाजिक कारण आहे का? असा प्रश्न आता उपस्थित होतो आहे. गोविंद जेठेवार यांना उपचारासाठी तेलंगणाच्या आदिलाबाद येथे हलविण्यात आले आहे. गोविंद लवकर बरे व्हावे यासाठी त्यांचे समर्थक देवाकडे प्रार्थना करत आहेत.

### रायगड जिल्ह्यातील अकरा मतदान केंद्रे अतिसंवेदनशील

**मुंबई** - रायगड जिल्ह्यातील ७ विधानसभा क्षेत्रांत ११ मतदान केंद्रे ही अतिसंवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहेत. या मतदान केंद्रांवर विशेष व अतिरिक्त पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. पेण मधील जांभूळवाडी, घोटे, जावळी, निफाड, करोडी, निधवली, वाशिवली, वरसई आणि वसई ३ या मतदान केंद्रांचा या यादीत समावेश असून, एक मतदान केंद्र हे श्रीवर्धनमधील रोहा आहे. पेण मधील गावांमध्ये प्राथमिक सोयीसुविधा नसल्याने येथील ग्रामस्थांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घातला होता. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे या मतदारसंघाचे खासदार आहेत. या गावांना अतिसंवेदनशील मतदान केंद्रांच्या यादीत टाकण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यातील सात विधानसभा मतदारसंघांत एकूण २८२० मतदान केंद्रे आहेत.

### लोहयात बहीण-भावात लढत आशा शिंदे विरुद्ध चिखलीकर

**लोहा** - लोहा मतदारसंघात शेकापचे विद्यमान आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या पत्नी आशा शिंदे, तसेच शिवसेना ठाकरे गटाचे एकनाथ पवार आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी खासदार प्रतापराव चिखलीकर यांच्यात तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. आशा शिंदे आणि प्रतापराव चिखलीकर हे बहीण-भाऊ आहेत. यामुळे ही लढत लक्षणीय होणार आहे. मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांनी राज्यात अनेक ठिकाणी उमेदवार उभा करणार असल्याचे जाहीर केले होते. लोहा विधानसभा मतदारसंघात मनोज जरांगे यांच्याकडून अनेक इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. मात्र, जरांगे यांनी निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे भावी आमदारांचा हिरमोड झाला आहे.

## बारामतीत अजित पवारांनंतर नवे नेतृत्व हवे! शरद पवारांचे वक्तव्य

■ बारामती

**३० वर्षे** अजित पवारांनी बारामतीत कामे केली. माझ्या मनात त्यांच्याबद्दल त्या संदर्भात कुठलीही तक्रार नाही. मात्र पुढील २५ वर्षे काम करू शकेल, असे नवे नेतृत्व आता तयार केले पाहिजे, असे वक्तव्य राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवारांनी केले.



शरदचंद्र पवार गटाचे नेते शरद पवार हे बारामती विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी नातू युगेंद्र पवार यांच्यासाठी मैदानात उतरले असून, त्यांनी आज बारामती तालुक्यातील ग्रामीण भागात चार तर शहरात दोन ठिकाणी सभा घेतल्या. बारामती तालुक्यातील शिरसुफळ येथे शरद पवार यांची प्रचार सभा झाली. या सभेदरम्यान त्यांनी अजित पवारांबाबत मोठे वक्तव्य केले. यावेळी त्यांनी युगेंद्रला उमेदवारी का दिली यामागील कारण देखील सांगितले.

अजित पवारांबाबत बोलताना शरद पवार म्हणाले की, राजकारण फक्त सत्ता आणि निवडणुकीसाठी नाही. राजकारणाचा उपयोग लोकांच्या जीवनात झाला तर त्याचा उपयोग आहे. तुम्ही ४ वेळा मला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री केले. २५ वर्षे मी बारामतीमध्ये काम केले.

## मानखुर्दमध्ये अबु आझमींनी ठाकरेंच्या शाखेला भेट दिली

■ मुंबई

**मानखुर्द** शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीतून (मविआ) समाजवादी पार्टीचे (सपा) उमेदवार अबु आझमी यांनी आज मानखुर्द पीएमजीपी कॉलनीतील ठाकरेंच्या शिवसेना शाखेला भेट दिली. एक्सवर पोस्ट करून आझमी यांनी याबाबत माहिती दिली. आम्हाला एकजुटीने संविधान वाचवायचे आहे आणि हिंदू-मुस्लिमांमधील बंधुभाव वृद्धिंगत करायचा आहे, अशी पोस्ट आझमी यांनी केली. सपाला मविआमध्ये दोन जागा देण्यात आल्या आहेत. परंतु अन्य आठ ठिकाणी सपाने आपले उमेदवार उभे केले असून, तिथे मैत्रीपूर्ण लढत होणार आहे.

## राज ठाकरे मोदी-शहा यांची तळी उचलतात

■ मुंबई

**राज** ठाकरे मोदी-शहांची तळी उचलतात अशी टीका ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली. काल राज ठाकरे यांनी शिवसेना ठाकरे गटावर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देत संजय राऊत म्हणाले की, राज ठाकरे यांनी गॅलरीत बघून बोलू नये, त्यांनी सभागृहात, मुख्य मैदानात काय चालले आहे यावरून बोलावे. शिवसेना ही बाळासाहेब ठाकरेंची होती. हीच शिवसेना एकनाथ शिंदेंच्या घशात घालणारे मोदी-शहा कोण? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित करायला हवा होता. शिवसेना कोणाची हे सांगण्यासाठी राज ठाकरे यांच्या प्रमाणपत्राची




आवश्यकता नाही. आज राज ठाकरे फडणवीस, अमित शहा आणि मोदी यांना आपले नेते मानतात. त्यांनीच ही बाळासाहेब ठाकरेंची प्रॉपर्टी बेकायदेशीरपणे एकनाथ शिंदे यांना दिली. त्याच भारतीय जनता पक्षाचा मुख्यमंत्री आपण महाराष्ट्रात करायला निघाला आहात.

राज ठाकरे यांना बाळासाहेब ठाकरे कधीही माफ करणार नाहीत. राज ठाकरे हे मोदी आणि शहा यांच्या पालख्या वाहत आहेत. ते मूळ मुद्दा सोडून बोलत आहेत. ते काय बोलतात, यावर महाराष्ट्र चालत नाही. राज ठाकरे यांना महाराष्ट्रात भाजपाचा मुख्यमंत्री करायचा आहे आणि तोच महाराष्ट्राचा शत्रू आहे. त्यामुळे राज ठाकरे काय बोलतात, याकडे जास्त लक्ष देण्याची आवश्यकता नाही.

## विधानसभा निवडणुकीत आता मायावतींचीही उडी



■ लखनौ

**महाराष्ट्राची** विधानसभा निवडणूक उत्तर प्रदेशसाठीही महत्त्वाची ठरत असून, बहुजन समाज पक्षाने या निवडणुकीत उडी घेतली आहे. राज्यात अनेक उमेदवार उभे केल्यानंतर त्यांनी आपल्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली. त्यांचे पुतणे आकाश आनंद यांच्यावर महाराष्ट्राच्या निवडणुकीची जबाबदारी सोपवली आहे.

मायावती यांच्या बहुजन समाज पक्षाने हरियाणा विधानसभा निवडणुकही लढवली होती. त्यांच्या उमेदवारांमुळे काँग्रेस उमेदवारांच्या मतांचे विभाजन झाले होते व त्याचा फायदा भाजपाला झाला होता. महाराष्ट्रातही भाजपाने मतविभागणीची रणनिती आखली असून, त्यासाठी विविध पक्षांना निवडणुकीत उतरवले आहे. त्याचप्रमाणे मायावती यांच्या पक्षानेही आपल्या उमेदवारांना अधिकाधिक मते मिळावीत यासाठी प्रचाराची राळ उडवून देण्याचे ठरवले आहे. या स्टार प्रचारकांच्या यादीत रामजी गौतम, नरबदा प्रसाद अहिरराव, सुनील डोंगरे, संतोष शिंदे आदी बसपा नेत्यांची नावे आहेत. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठीही मायावतींनी आपल्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.

## दगडूशेठ हलवाई गणपतीला ११०० नारळांचा महानैवेद्य



गाणपत्य संप्रदायाच्या वतीने कार्तिक शुद्ध चतुर्थीनिमित्त श्री उमांगमलज जन्मोत्सवात आज तब्बल ११०० नारळांचा महानैवेद्य दाखवून श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची पूजा करण्यात आली. यानिमित्त दगडूशेठ मंदिरात नारळांची आरास करण्यात आली. पहाटे तीन वाजता ब्रह्मणस्पती सूक्तपठण झाले.

## जत तालुक्यात भाजपाकडून लिंगायत समाजावर अन्याय

**अभिनव गुरुलिंग जंगमा महास्वामीजींचा आरोप**

■ सांगली

**जत** तालुक्यात लिंगायत समाजाची लोकसंख्या लाखोंच्या घरात आहे. तरीही भाजपाने लिंगायत समाजाला तिकीट दिले नाही. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह भाजपाच्या नेत्यांनी लिंगायत समाजावर केलेला हा अन्याय आहे, असा आरोप अभिनव गुरुलिंग जंगमा महास्वामीजी यांनी केला आहे.

अभिनव गुरुलिंग जंगमा महास्वामीजी म्हणाले की, भाजपाच्या नेत्यांनी आमच्या समाजाकडे दुर्लक्ष करून जत मतदारसंघात सुरू असलेल्या निवडणुकीत पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करणारे तम्मनगौडा रवीपाटील यांचा विश्वासघात केला आहे. त्यामुळे संपूर्ण मतदारसंघातील सर्व समाजाच्या लोकांनी भाजपाच्या विरोधात भूमिका घेतली आहे. या मतदारसंघात भाजपाने उपरा असलेले गोपीचंद पडळकर यांचे मतदारसंघात नाव नसताना उमेदवारी दिली आहे.

पडळकर हे या तालुक्यातील नाहीत, त्यांना येथील प्रश्नच माहीत नसतील तर ते कोणता विकास करणार? खरे तर लाखोंच्या संख्येने असलेल्या लिंगायत समाजातील एकही आमदार आजपर्यंत निवडून आला नाही ही एक शोकांतिकाच म्हणावी लागेल.

## भारत सरकारकडून विकिपीडियाला नोटीस

■ नवी दिल्ली

**भारत** सरकारने विकिपीडिया या ज्ञानकोष माहिती माध्यमाला नोटीस बजावली असून, त्यात देशाविषयी चुकीची माहिती दिल्याबद्दल जाब विचारला आहे. एएनआय या वृत्तसंस्थेने दिलेल्या तक्रारीवरून ही नोटीस बजावण्यात आली आहे. सरकारने म्हटले आहे की, तुम्हाला मध्यस्थांऐवजी प्रकाशक का समजू नये? एएनआय या वृत्तसंस्थेने विकिपीडिया विरोधात एक याचिका दाखल केली होती. त्याच्या सुनावणी दरम्यान दिल्ली उच्च न्यायालयानेही विकिपीडियाला सुनावले होते. त्यांच्या मजकुरात वृत्तसंस्था म्हणजे सरकारच्या प्रचाराचे साधन असा अर्थ देण्यात आला होता. जो वृत्तसंस्थांसाठी अपमानास्पद आहे. वृत्तसंस्थांचे काम हे निष्पक्षपातीपणे वृत्त देणे असे असते. या माहितीमुळे भारतीय वृत्तसंस्थांबद्दल गैरसमज निर्माण होण्याची शक्यता आहे.

## लाडक्या बहिणी मला नक्कीच मत देतील! देवेंद्र फडणवीसांना विश्वास



■ नागपूर

**लाडक्या** बहिणी मला नक्कीच मतदान करतील असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे उमेदवार स्पष्ट झाल्यानंतर आता प्रचाराचा धुराळा उडाला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीकडून अनेक सभांचे आयोजन केले जात आहे. आज दक्षिण-पश्चिम नागपूर येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भव्य जनसंपर्क रॅली झाली. भरत पेट्रोल पंप चौकातून रॅलीचा शुभारंभ होत रॅली प्रचंड उत्साहात पार पडली. कार्यकर्त्यांकडून मुलींसाठी मोफत शिक्षण, लाडक्या बहिणींचा लाडका देवाभाऊ तसेच महायुती सरकारच्या योजनांचे पोस्टर दाखवण्यात येत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मी आधुनिक अभिमन्यू आहे. कितीही चक्रव्यूहात टाकण्याचा प्रयत्न केला तरीही चक्रव्यूह भेदून बाहेर येणार या विधानाचा पुन्हा उच्चार केला. महाराष्ट्रात महायुतीला बहुमत मिळणार आहे, सहाव्यांदा दक्षिण-पश्चिम नागपूरमधील जनतेच्या आशीर्वादाने मी निवडून येईन. बंडखोरी करणाऱ्यांवर महायुती कारवाई करणार असून, महायुतीचा उमेदवार निवडून आणू. जनतेचा प्रचंड प्रतिसाद मला मिळत आहे. माझ्या लाडक्या बहिणी मला नक्कीच मतदान करतील. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी राहुल गांधींच्या नागपूरमधील संविधान संमेलन आणि काँग्रेसवर टीका केली, ते म्हणाले की, संविधानाचा सर्वाधिक अनादर फक्त काँग्रेस पक्षाने केला आहे.

## दोन दिवसांत सर्व सुरळीत सुनील तटकरेंना विश्वास

■ मुंबई

**महायुतीमध्ये** अपवादात्मक मतदारसंघात बंडखोरी करून अर्ज दाखल केले त्या सगळ्यांशी चर्चा करून येत्या दोन दिवसांत सर्व काही सुरळीत होईल, असा विश्वास राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी व्यक्त केला आहे. ते आज प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

यावेळी ते म्हणाले की, काही जागांबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अजित पवार यांच्याशी एकत्रित चर्चा झाली आहे. जे मतदारसंघ सोडण्याचे निश्चित झाले होते त्याठिकाणी एकत्रित काम कसे करता येईल यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. एक-दोन दिवसांत सर्वांची समजूत घालून मतदारसंघातील वातावरण महायुतीसाठी सकारात्मक होईल याचा प्रयत्न सुरू आहे. महायुती राज्यातील २८८ जागांवर पूर्ण ताकदीने निवडणूक लढवत आहे.

## वंचितच्या जाहीरनाम्यात आरक्षणाला संरक्षण शेतमालाला हमी भावाचे आश्वासन

■ मुंबई

**विधानसभा** निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. वंचितच्या जाहीरनाम्यात आरक्षणाला संरक्षण तसेच शेतमालाला हमीभाव आणि शैक्षणिक क्षेत्रातील गुंतवणूक ५ टक्क्यांवरून ९ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

आज वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी त्यांच्या पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यात म्हटले आहे की, सार्वजनिक क्षेत्र हे देशातील अर्थव्यवस्थेचा कणा आहे. सध्या सार्वजनिक क्षेत्र विकण्याची प्रक्रिया चालली आहे. तिला आम्ही थांबवणार आहोत. त्याकरिता नवीन औद्योगिक धोरण आम्ही राबवणार आहोत. ज्यामुळे शेतीपूरक उद्योगांना प्राधान्य देण्यात येईल. आम्ही सत्तेत आल्यावर कापसाचा प्रति क्विंटल भाव किमान ९ हजार आणि सोयाबीनला ५ ते ६ हजार भाव दिला जाईल. शेतीला औद्योगिक दर्जा मिळावा या दृष्टीने आमचा जाहीरनामा सर्वसमावेशक आहे. ओबीसींना पदोन्नतीत आरक्षण असले पाहिजे, ही मागणी देखील आम्ही करत आहोत. कंत्राटी कामगाराला ५८ वर्षांपर्यंत निवृत्त करायचे नाही, असा धोरणात्मक निर्णय आम्ही घेतला आहे.

## इंडिया आघाडीचा बीकेसीत एल्गार 'काँग्रेसची गॅरंटी' जाहीर होणार

■ मुंबई

**इंडिया** आघाडीची 'स्वाभिमान सभा' उद्या बुधवार ६ नोव्हेंबर रोजी होणार आहे. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये ५ वाजता होणाऱ्या या सभेत मा. मल्लिकार्जून खरगे, मा. राहुल गांधी, मा. उद्धव बाळासाहेब ठाकरे, मा. शरदचंद्र पवार उपस्थित राहणार आहेत. महाविकास आघाडीची महाराष्ट्रासाठी 'गॅरंटी' यावेळी जाहीर होणार आहे.

महाराष्ट्राची दिवसेंदिवस पिछेहाट करणाऱ्या भाजप आणि महायुतीच्या कारभाराचा पंचनामा करत महाविकास आघाडीचा एल्गार या सभेत होणार आहे. मुंबईकरांचा आवाज या निमित्ताने बुलंद करण्यात येणार आहे. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स मधील एशियन हार्ट हॉस्पिटल समोर जीटीएसटी मैदान येथे ही सभा होईल. या स्वाभिमान सभेत मुंबईकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खासदार वर्षाताई गायकवाड यांनी केले आहे.

## मिलिंद देवरा पैसे वाटतात निवडणूक आयोगाकडे तक्रार



■ मुंबई

**वरळी** मतदारसंघातील शिंदे गटाचे उमेदवार मिलिंद देवरा यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना काढलेल्या शोभायात्रेत पैसे देऊन माणसे आणल्याचा आरोप ठाकरे गटाकडून करण्यात आला आहे. यासंदर्भात ठाकरे गटाचे खासदार अनिल देसाई यांनी मुख्य निवडणूक आयोगाकडे पत्र लिहून तक्रार केली आहे.

त्यांनी पत्रात म्हटले की, वरळी विधानसभेतील शिवसेना शिंदे गट उमेदवार मिलिंद देवरा यांचा उमेदवारी अर्ज दाखल करताना काढलेल्या शोभायात्रेचे व्हिडिओ जोडत आहोत. सदर शोभायात्रेत चित्रीकरण करणाऱ्या माध्यम प्रतिनिधींनी या शोभायात्रेत सहभागी लोकांना विचारले असता त्यांनी आपल्याला प्रत्येकी ५०० रुपये देऊन शोभायात्रेत सहभागी होण्यास सांगितल्याचे कॅमेऱ्यात कबूल केले. ज्याचे असंख्य व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाले आहेत. यानंतर मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी ठाकरे गटाच्या पत्राची दखल घेऊन अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी यांना सूचना दिल्या. देसाईंनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करण्यात यावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल २४ तासांत कार्यालयास सादर करावा, असे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

## मुंबई विमानतळावर दुर्मिळ कासवे जप्त

■ मुंबई

**मुंबई** आंतरराष्ट्रीय विमानतळावर तस्करीच्या उद्देशाने आणलेली दुर्मिळ कासवे जप्त करण्यात आली आहेत. सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी १२ दुर्मिळ जातीची ही कासवे जप्त करून ती त्यांच्या मूळ देशात परत पाठवली आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात या कासवांची किंमत प्रत्येकी २०० ते २५० डॉलर असल्याचे सांगण्यात येते.

आज मुंबई विमानतळावर थायलंडच्या बँकॉक इथून आलेल्या एका प्रवाशाने ही कासवे आणली होती. त्याच्या जेवणाच्या डब्यात ही कासवे लपवली होती. कर्मचाऱ्यांना त्याचा संशय आल्यानंतर त्याच्या सामानाची तपासणी केली असता ही कासवे सापडली. यातील ८ कासवे ही जपानी



पाँड टर्टल असूनण ४ स्कॉर्पियन मज टर्टल या जातींची आहेत. ही सर्व कासवे त्यांच्या मूळ देशात परत पाठवण्यात आली आहेत.

## पुण्यात आठ मतदारसंघांत 'पवार विरुद्ध पवार' लढत



■ पुणे

**पुणे** जिल्ह्यातील २१ मतदारसंघांमधील लढतीचे चित्र काल दुपारी ३ वाजता स्पष्ट झाले. त्यापैकी बारामती मतदारसंघ हा हाय व्होल्टेज ठरला आहे. येथे उप मुख्यमंत्री अजित पवार आणि पुतणे युगेंद्र पवार असा सामना होत आहे. अन्य मतदारसंघांपैकी बहुतांश मतदारसंघांमध्ये बंडखोरी झाली आहे.

महायुती विरुध्द महाविकास आघाडी अशी वरवर लढत असली तरी जिल्ह्यातील आठ मतदारसंघांत शरद पवार विरुद्ध अजित पवार अशीच लढत होणार आहे. बारामती, वडगाव शेरी, हडपसर, आंबेगाव, जुन्नर, पिंपरी, इंदापूर आणि शिरूर या मतदारसंघांचा त्यात समावेश आहे. काही ठिकाणी शरद पवार यांची राष्ट्रवादी विरुध्द भाजपा अशी चुरशीची लढत होईल असे चित्र आहे. काहींनी बंडखोरांनी नेत्यांच्या म्हणण्याला मान देत, काहींनी स्वत:च्या मागण्यांवर आश्वासन घेत उमेदवारी अर्ज मागे घेतले, तरीही काही ठिकाणी बंडखोरी कायम राहिली. जिल्ह्यातील बहुतांश मतदारसंघांत बंडखोरी झाली आहे. त्यात प्रामुख्याने पुणे शहरात कसबा, शिवाजीनगर, पर्वती, तर जिल्ह्यात जुन्नर, इंदापूर, पुरंदर, भोर या मतदारसंघांचा समावेश आहे. या ठिकाणच्या लढतींमध्ये बंडखोर उमेदवार निवडणुकीच्या निकालात निर्णायक ठरतील, असा अंदाज आहे.

## विदर्भातील ३२ मतदारसंघांत बंडखोरांचा प्रभाव दिसणार

■ नागपूर

**निवडणुकीत** अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत अनेक मतदारसंघांमधील बंडाळी मोडून काढण्यात महायुती व महाविकास आघाडीच्या नेत्यांना यश आले असले तरी विदर्भातील ६२ पैकी ३२ मतदारसंघांत बंडखोरांनी अर्ज कायम ठेवले आहेत. या बंडखोरांमुळे महाविकास आघाडीच्या २२ उमेदवारांना तर महायुतीच्या २० उमेदवारांना स्वपक्षीयांचा कमीअधिक त्रास होईल, अशी चिन्हे आहेत. १५ जागांवर मात्र आघाडी व महायुतीच्या उमेदवारांपुढे बंडखोरांचे तगडे आव्हान राहील. बंडखोरांचा राग शांत करण्यासाठी पक्षश्रेष्ठींकडून विशेष दूत गेल्या दोन दिवसांपासून कार्यरत होते. त्यामुळे बहुतेक ठिकाणी बंड शमविण्यात आले आहे.